# प्रा. विश्वास वसेकर



BVBK-0402641

विचार केला.

दारात पाय टाकताच गंभीर चेहरा करून म्हणाले,

शैला, मला पिसाळलेले कुत्रं चावलं नं !

ती जवळजवळ किचाळलीच. पण माझ्या चेहऱ्याकडे काळजीपूर्वक पाहून म्हणाली,

एवढा फेरफटका मारून झाला तरी थट्टा करायला कोणी भेटलं नाही वाटतं ?

अग, खरंच चावलंय. हे बघ–

मी उजव्या पायावरची पॅन्ट वर सरकवली. चावा घेतलेली जागा आता चांगलीच रक्ताळली होती. मी खुर्चीवर बसलो. शैलाने पाय हातात घेतला नि माझ्यावर प्रश्नांचा भडीमार केला, कसं चावलं,का चावलं ? वगैरे. मी थोडक्यात सगळी हकीकत सांगितली. कुत्रा पिसाळलेला नव्हता हेही सांगितले. तरी ती म्हणाली,

चला बरं डॉक्टरकडे

अग, आधी डेटॉल किंवा हळद तरी लाव.

शैलाबरोबर मीही आत गेलो. तिने कापसाचा बोळा डेटॉलमधे बुडवून त्याने जखम पुसून काढली. मग त्यावर हळद लावली.

एव्हाना दहा वाजत आले होते. जेवण करून निघायला पाहिजे कॉलेजला. तसे म्हणताच शैलाने रजा पाठवण्याचा हट्ट धरला. मग्रेच आठवून मी म्हणालो,

लेकरं कुठं दिसत नाहीत.

त्यांना खेळण्याशिवाय दुसरं काही सुचते नरी काय ? आत्ता गुलाबचा रिक्षा येईल शाळेत न्यायला. अहो, गुलाबच्या रिक्षातूनच जाऊन या नं डॉक्टरकडे. चला गडे, ऐकत जा थोडं माणसाचं. उठा बरं. तो पहा आलाच गुलाब.

फाटकाबाहेर गुलाब रिक्षा थाबवून उभा होता. नेहमीप्रमाणे 'चला–सोनू, गुंडूऽऽ' अशी हाक मारण्यासाठी तोंड उघडतानाच त्याचे आमच्याकडे लक्ष गेले. त्याने 'आऽ' बंद केला. मला एकदम हसू आले.

BVBK-0402641

गुलाब, आधी मला डॉक्टरकडे सोड आणि मग लेकरांना शाळेत घेऊन जा.

रस्त्याने यावेळी गुलाबने फाजील चौकशा केल्या नाहीत ही समाधानाची बाब. अन्यथा खेकसण्याच्या तयारीतच होतो मी. अकारण मलाही गंभीरपणा आला. डॉक्टरच्या घरासमोर सोडून गुलाब माघारी वळला.

डॉक्टर जोशी हे इथले मेडिकल ऑफिसर आहेत. पण खाजगी प्रॅक्टीसकडे अधिक लक्ष असल्याने शासकीय रुग्णालयात क्वचितच भेटतात. भेटले तरी त्यांच्या घरी किंवा दवाखान्यात येण्यास सुचवितात. आम्ही सरळ घरीच आलो. व्हरांड्यातच होते. 'डॉक्टर आहेत बसा.' ते वाचून आम्ही बसतो न बसतो, तोच डॉक्टर आले,

हं, काय सर ?

तसं विशेष काही नाही. सकाळी कुत्रं चावलं !

डॉक्टरांनी जखम पाहिली. दाताच्या व्रणाच्या आजूबाजूला सूज आली होती. डॉक्टरांना सांगितले, जखमेला डेटॉलने पुसून हळदा लावली. डॉक्टर म्हणाले, तुम्ही कुत्रा आयडेंटीफाय करू शकता काय?

हो हो. त्याची सविस्तर हिस्ट्रीदेखील विचारली मी. तो पिसाळलेला वगैरे काही नाही.

डॉक्टरांनी धनुर्वाताचे इंजेक्शन दिले.हातात काही गोळ्या ठेवल्या म्हणाले, 'ती जागा सुजली असल्याने त्यासाठी या गोळ्या. सकाळ दुपार संध्याकाळ एकेक घ्या. सूज कमी होऊन जाईल.'

'थँक्यू डॉक्टर! मग ती पोटातली चौदा इंजेक्शन्स घ्यायची गरज नाही नं ?'

दहा दिवस कुत्रा ऑब्झर्व करायचा. या काळात जर तो मेला तर चौदा इंजेक्शन्स घ्यावी लागतील. दहा दिवस जर तो जिवंत राहला तर मग गरज नाही.

डॉक्टरच्या घराबाहेर पडताच रिक्शा केली नी घरी आलो. सडकून भूक लागलेली होती. दाराशी येताच मोत्या लखलख शेपूट हालवत होता आणि 'बऽऽहऽऽऽ' असा आवाज काढून ओरडत होता.जरा

चोंभाळले तेव्हा गडी शांत झाला.

'मोत्या, आज तुझा भाऊबंद माझ्या नाहक आला की रे अंगावर!'

बायको दारातच उभी.

'काय म्हणाले डॉक्टर ? घेतलं का इंजेक्शन ?'

'सगळं केलं. आधी वाढ मला. खूप भूक लागलीय.'

दोघंही स्वयंपाकघरात गेलो. हात धुऊन ताटं डार्यानिंग टेबलावर ठवली. पाणी भरून घेतले.

'पिल्ले गेली का ग शाळेत ?'

'हो. सारखं म्हणत होते आम्हाला बाबाना पहायचंय. त्यांना कुठं चावला ते पहायचंय. आज आम्ही शाळेत जात नाहीत.पण मी म्हणाले एखादवेळी बाबांबरोबर डॉक्टरदेखील घरी येतील अन तुम्हाला पण इंजेक्शन घ्यावे लागेल, तेव्हा कुठं जायला तयार झाले!'

त्या कल्पनाचित्राने क्षणभर उचंबळून आल्यासारखे झाले. मोठ्या आरामात गप्पागोष्टी करत आज जेवण चालले होते.

'व्वा! काय निवांतपणा मिळालाय आज! नाही तर रोज कॉलेजची वेळ साधण्याच्या धसकीने घशाखाली घास उतरत नाही. मस्त आयुष्य असते बाकी तुम्हा बायकांचं! एकदा नवरा घराबाहेर पडला की रिलॅक्स! आम्ही ज्यावेळी सायकलवर बाहेरून पाय आणि आतून आतडं पिळत पळत असतो त्यावेळी तुम्ही कॉटवर मस्त ताणून देत 'फिल्मबाजी' किंवा 'चंदेरी दुनियेत' वाचत असता.'

बायको मोठे डोळे करून पहात काही तरी झणझणीत बोलणार, एवढ्यात मजुरणीने दार ठोठावलं.

'मावशी, आधी धुणं घ्या. तोवर आम्ही जेवण करतो.'

शैला हे बोलत असताना, तेवढ्याच संधीचा फायदा घेऊन मी हात धुण्यासाठी उठलो. कॉटवर आडवं होईपर्यंत शैला बडीशेपेचे भांडे घेऊन आली.

'व्वा! कसं उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू झाल्यासारखं वाटतंय. आऽहाऽहा. एऽ लेकरं शाळेत गेलेली... मावशी आता धुणंभांडी करून जातील ..कुणी कुणी येण्याची शक्यता नाही. फुरसत भी है,

मौसम भी है ? काय ? और मौसम का तकादा है,' मी गात गात विचारले, 'आज मॅटिनी शो करूयात का ?'

'खूप असेल बरं तकादा ! धंदा काय आहे दुसरा मौसमला.' आणि पुढचे वाक्य म्हणता म्हणताच तिला हसू आले,

'गप पडा आता कुत्र्यावाणी. मला माझी कामं आहेत.'

'च्यायला ! झाली सुरुवात आमच्या कुत्र्यावर कोटया व्हायला! आता आमची दोस्त मंडळी या विषयावर शक्य तेवढे जोक्स करून बोअर करणार हे दिसतंय.'

अचानक मला माझ्या लहानपणीच्या लाडक्या कुत्र्याची आठवण झाली. त्याच्यावरूनच मी सध्याच्या कुत्र्याचे नाव मोत्या ठेवले आहे. पाच–सहा वर्षांचा असेन मी तेव्हा. मोत्या माझा किती लाडका होता यासंबंधी आजी खूप आठवणी सांगायची. आठ–दहा वर्षे तो आमच्याकडे होता. म्हणजे मलाही वयाने वडील. घराच्या मोठया ओसरीवर त्याचे आणि माझेच साम्राज्य असे. माझा सर्वात जुना, म्हणजे सर्वात पहिला फोटो आहे तो त्याच्या सोबतचा. माझ्या पहिल्या कवितेचा विषय आणि नायकही तोच होता. अजून ओळी आठवतात.

मनी मावशी तुझ्याही पेक्षा
इमानी आहे अमुचा मोत्या
राखण करतो घरा नी शेतां
मित्र खरा मजशी

आमच्याकडे गावी नागोबा देव नावाचे पुराणिक यायचे. चुलत्याचे ते सासरे. त्यामुळे पुराणाच्या काळात मुक्काम आमच्याच घरी असायचा. त्यांनाही कविता म्हणून दाखवायला आजीने सांगितले. त्या वेळी 'घरा नी शेता' यात त्यांनी श्लेष शोधला. 'घराची रात्री राखण करतो' हा एक अर्थ आणि 'घराचे व शेताचे राखण करतो' हा दुसरा. मला पहिला अर्थ कळाला वा अभिप्रेत नव्हता. खूप मजा वाटली होती

एकदा मोत्या, गावाबाहेर सडक्या जनावराचे मांस खाऊन आला

असावा, ओकला. आजीने त्याला खूप मारले. मोत्या फारच मनस्वी. जो गेला तो तीन–चार दिवस आलाच नाही. आणि एके दिवशी सकाळी मोत्या दारापुढे मरून पडलेला. मृत्यूचा हा माझा पहिला अनुभव. तोवर मरणे म्हणजे काय असते हे मला ठाऊकच नव्हते. आजी सांगायची की मी तेव्हा मोत्याशी एवढा भावनाविवश बोललो की सगळ्यांना रडायलाच आले. ' मोत्या, कुठं होतास रे दोन दिवस. जेवला नाहीस, काही नाही. चल नं घरात, तुला भाकरी वाढतो. चल नं रे मोत्या.'

असा माझा बालमित्र मोत्या. त्याच्या तोंडात आम्ही हात घालायचो. पण कधी चावला नाही. अन् सालं हे दीड दमडीचं कुत्र !

चांगलीच झोप झाली. उठलो तेव्हा चक्क चार वाजले होते. चहा घेताना लांबूनच लेकरांचे नादकल्लोळ ऐकू आले. मला असे होते तेव्हा फारच भरून येते. टागोरांची अशी कविता आहे की मी त्याला अजून पाहिले नाही, पण त्याची बासरी मात्र ऐकू येते आहे...आणि बोरकर... घुमतो पावा सांग कुठून–कृष्ण कसा उमटे न अजून,

आणि माझा कृष्ण उमटला. दप्तर भिरकवून देत सरळ रानडुकरासारखी धडक मारून अंगावर. लगेच त्याला कसलीशी आठवण झाली. छातीवर रेलत, चेहऱ्यावर काळजी अन् उत्सुकता, भोकरे डोळे रोखून विचारले,

' बाबा, तुम्हाला कुठं चावलं कुत्रं ?'

गुंडूरावच्या प्रश्नांत भर टाकायला सोनूताई सरसावल्या. कोणाचं कुत्रं होतं ? त्याला त्याच्या घरी बांधलं नव्हतं का? का दोरी तोडून पळालं ? तुमच्या जवळ आल्यावर तुम्ही त्याला हाकललं का नाही? वगैरे असंख्य प्रश्न. या प्रश्नांपासून तो प्रत्यक्ष स्पॉट इन्जेक्शनपर्यंत सर्व काही व्यवस्थित समजून द्यावे लागले, इंजेक्शन दिलेला दंडही दाखवावा लागला. एवढे सगळे झाल्यानंतर मगच जोडगोळी ऊर्फ गोडजोडी खेळायला बाहेर पडली.

पाच साडेपाच वाजता बाहेर दोन–तीन लुना स्कूटर थांबल्याचे आवाज ऐकू आले. आमचे स्टाफ मेंबर्स आले वाटते भेटायला.पाण्या-

वर रॉकेल पसरते तशी या गावात बातमी पसरते. रॉकेल कॉलेज-पर्यंत गेले वाटते पांगत ?

काही दुखत वगैरे नव्हते. तरीही योगायोगाने मी पलंगावर पडलेलाच होतो.

पुन्हा या निमित्ताने कोण चावले ? कसे चावले ? कुठं चावले ? हे खिदळत खिदळत विचारून झाले. चहा-सिगरेटींबरोबर हाहा हीहीचा एक राऊंड झाला.

'मग उद्या येणार की नाही कॉलेजला ?' अन्याने विचारले.

'उद्या कॉलेजला नाही आलो तर उरलेले प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे थवे इथं उतरतील. त्यापेक्षा–'

माझे वाक्य तोडून एटी म्हणाला, 'म्हणते भीक नको पण कुत्रा आवर–'

'कुत्रा चालेल, पण चौकशी नको'–दुसरा

'वा, वा ! ही म्हण अमृत मासिकाला पाठवून द्या नव्या म्हणी या सदरात.'

'आणि एक रुपया व अंक मिळवा.'

पुन्हा सगळ्यांचे हॅ हॅ हॅ हॅ. अशा गप्पा अर्धा पाऊणतास. मग सगळे निघाले.

कडाडून भूक लागलेली. स्वयंपाकही दरम्यान तयार होता. उद्याच्या शिकवण्याची तयारी करण्याचा प्रश्न नव्हता. आजचे प्रिप-रेशन उद्या चालेल. जेवून लगेच गाढ झोपलो.

●

## शुक्रवार / १० जानेवारी

चावल्याच्या जखमेजवळची सूज अजूनही कमी झाली नाही. किंचित कळही निघते आहे. सकाळी आंघोळ करण्यापूर्वी पुन्हा डेटॉलने पुसून जखम स्वच्छ केली.

कॉलेजला जाताना गायरानात रस्त्यात पहुडलेली दोन–तीन मोकाट कुत्री भेटली. ही आजच इथे आली असं नाही. कदाचित रोजचा त्यांचा मुक्कामही इथे असेल. पण यापूर्वी मला त्यांचे अस्तित्व कधी जाणवले नव्हते. माझी सायकल त्यांच्या जवळ आली तरीही रस्त्यातून हटेनात. जोरात सायकलची घंटा वाजवली आणि तत्क्षणी भीतीने अंगावर काटा आला. अगदी सरसरून. परवाच्या कुत्र्याला सायकलीचा राग होता. यांना घंटी वाजवण्याचा तर नसेल ? येतात की काय अंगावर धावून ? पण असे झाले नाही. विचारी निमूटपणे उठली आणि बाजूला झाली. मी बराच वेळ सायकल मागे पहात पहातच चालवली.

स्टाफ रूममध्ये पाय टाकल्या टाकल्या एकजण म्हणाला,

‘ कशी काय आहे आहे त्या कुत्र्याची तब्येत ?’

दुसरा, ‘ ह्याला चावला म्हणजे तो बहुधा मेला ! ’

मी म्हणालो, ‘ खांडेकरांना साप चावला होता आणि ते वाचले तेव्हा फडके म्हणाले होते बहुधा तो सापच मेला असेल म्हणून. ’

कुत्र्यावरील विनोद आज अपेक्षितच होते. आल्या आल्या ते

झाल्याने एखादे ऋण फिटल्यासारखा मी रिलॅक्स होऊन वर्गावर गेलो,

पण एवढ्याने काही संपणारे नव्हते. आज कॉलेजमध्ये कुणीतरी पाहुणे आले होते. या संस्थेत अशा प्रसंगी पाहुण्यांचा स्टाफशी परिचय करून देण्याची प्रथा आहे. चहापानाच्या मध्यंतरात हा सोपस्कार उरकला जात असतो. त्यावरून पुन्हा माझी थट्टा सुरू झाली.

पाहुणे येतील तेव्हा मी माझा परिचय कसा करून देई ? अनिलने दोन्ही हात मनगटाच्या जवळ मुडपून वर धरले. कुत्रा दोन पायांवर उभा रहातो तशी पोझ घेतली, म्हणाला, 'मी, कुत्रा' आणि लांब जीभ बाहेर काढली. सगळ्यांसोबत मलादेखील प्रचंड हसू आले. सगळे नकला करणाऱ्या अनिलभोवती गोळा झाले. एवढ्यात बेल झाली. पुन: दुसऱ्या वर्गावर पिरीएडसाठी मी गेलो.

त्यानंतर मध्यंतराच्या परिचयाच्या कार्यक्रमात मला स्वत:चा परिचय करून देताना मघाच्या विनोदाची आठवण येऊन हसू आले. पाहुणे व प्राचार्य सोडून सगळ्यांनाच हसू आले.

आज कॉलेजच्या वेळात कुत्र्यावरून एवढे विनोद झाले की डोक्यात सारखा कुत्राच होता. रिकाम्या तासात मेहुणीला पत्र लिहिले त्याची सुरुवात 'प्रिय वसूस – भो भो भो' आणि शेवटी 'तुझाच – कुत्रा' असा झाला तोही या वातावरणाचाच परिणाम असला पाहिजे.

चार वाजता घरी निघालो, तेव्हा श्रीकांत सोबत असल्याने गप्पा मारत हातात सायकल घेऊन पायीच निघालो. श्रीकांतने फार पूर्वी टाइम्समध्ये वाचलेली एक बातमी सांगितली. मुंबईला एक महिला मरिन ड्राइव्हवरून नोकरीसाठी पायी चालत जात-येत असे. एक-दोन दिवस सातत्याने तिला जाणवले की समुद्रावरून नजर टाकताना तिला कधी नाही असे बेचैन वाटते आहे. तिसऱ्या दिवशी त्याचे प्रमाण वाढले. तिने डॉक्टरांकडे जाऊन प्रकृतीची संपूर्ण तपासणी केली. तर तिच्या प्रकृतीत डॉक्टरांना ॲब्नॉर्मल असे काही आढळले नाही. दहाव्या दिवशी ती हायड्रोफोबियाने मेली !

श्रीकांत सांगत होता की हायड्रोफोबियाचे हे वैशिष्ट्य आहे की,

तो आयुष्यात केव्हाही होऊ शकतो. मुंबईच्या त्या महिलेस लहानपणी कुत्र्याचे पिलू चावले होते. आणि एकदा का हायड्रोफोबिया झाला की काही इलाज नाही.

च्यायला ! हा नाहक डोके पोखरणारा किडा घुसला की आपल्या डोक्यात !

घरी आल्यावर चहा घेताना ठरवले की, हा फालतू विषय निग्रह-पूर्वक मनातून काढून टाकायचा.

साडेसहा सातला फुलारी, जोशी, गुटेमामा आणि आळसे आले. त्यांना आमचा कुत्रालाप कुठून तरी कळला असावा, ऑफिसमधून ते तडक घरी आले. मी सहज पलंगावर लोळत होतो. डास चावताहेत म्हणून शाल ओढून घेतली होती. मला त्या अवस्थेत पाहून फुलारींचा चेहरा काळजीने वेढला. बरोबरच आहे, जिगरी दोस्त न आमचे. जवळ येऊन बसते फुलारींनी विचारले,

'क्युं प्राध्यापक, क्या हुआ ?'

'कुछ खास नही यार... ने काटा. एका दुष्मनाचे नाव घालून मी विनोद करण्याचा प्रयत्न केला. फुलारी हसले. मग सगळे क्रमाने सांगून झाले. कसा चावला, कुठे चावला...

जोशीने विचारले, 'मग चौदा इंजेक्शनचा कोर्स सुरू केला का नाही ?'

'डॉ. जोशी म्हणाले, गरज नाही. दहा दिवस त्या कुत्र्याचे निरीक्षण ठेवायचे. त्या काळात त्याचे काही झाले, तरच इंजेक्शने घ्यायची.' मी सांगितले.

'नही जी, ऐसा नही' हातावर थोपटत फुलारी म्हणाले, 'प्रिकॉशन म्हणून घेण्यास काय हरकत आहे ? इंजेक्शनने घेण्यात काही नुकसान तर नाही ना ?'

'काय माहीत ? यह मेरी जिंदगी का पहला ही कुत्ता है !' मी वातावरण प्रसन्न करण्याचा प्रयत्न करण्यासाठी म्हणालो.

जोशीने विचारले, 'कुंडलवाडीला याचे फार चांगले औषध

मिळते, माहीत आहे ?'

इतक्यात शेजारचा मधू आला. मधू बारावीपर्यंतचा माझा विद्यार्थी. नुकतेच त्याने एम. बी. बी. एस. पूर्ण केले. दारातूनच मधूने विचारले,

'काय सर, तुम्हाला कुत्रं चावलं म्हणे ?'

मग मधूसाठी पुन्हा सगळा पाढा वाचणे आले. शेवटी डॉ. जोशींचे मतही सांगितले की कुत्रा दहा दिवस वाचला तर काही प्रश्न नाही.

मधू सांगत होता, 'परवा परभणीला आमच्याकडे हायड्रोफोबियाची केस आली होती. फार रेअर असते ना म्हणून आम्ही सगळे मुद्दाम पहायला गेलोत. बाई होती. भांड्यात पाणी घेऊन असं जवळ नेलं की ती बाई मोठमोठ्याने ओरडायची. आम्ही तिची निरनिराळ्या प्रकारे चौकशी केली. तिचं म्हणणं असं की तिनं चौदा इंजेक्शनेही घेतली आणि ते कुत्रंही जिवंत आहे. ती लाख म्हणत असली तरी हे शक्यच नाही. एक तर तिला दिलेली इंजेक्शन्स फ्रीजमध्ये ठेवलेली नसतील. खेड्यात कुठलं आलंय फ्रीजन ब्रीज ! फ्रीजमध्ये न ठेवलेल्या रेबीजच्या इंजेक्शनचा परिणामच नष्ट होतो. आता कुत्र्याबद्दल ती म्हणत आहे ना, तेही चूकच असलं पाहिजे. कुत्रा आयडेंटीफाय करण्यात तिची नक्कीच गल्लत होत असली पाहिजे. तिला चावलं एक कुत्रं अन् ती समजते दुसरंच...'

एकेक करत सगळे उठून गेले. एकेका विधानाचे खडे टाकून गेले माझ्या शांत मनाच्या तळ्यात. त्यांची वलयं आता वाढत – विस्तारत जातील.

आपल्याला तरी ते कुत्रं नीट, नक्की ओळखता येईल का ? मायला ! हे नस्त खेंगटं मागं लागलं !

माझा चेहरा ओढला गेल्याचे बायकोच्या लक्षात आले असावे. याबाबतीत एक्साईट होण्याची तिची खास पद्धत आहे.

'पाठवत का नाहीत कुणाला कुंडलवाडीला. इंजेक्शन घेण्याचा एक तुम्हाला भारी कंटाळा आहे. थोडं टोचण्यामाठी एवढं कासावीस होता, त्या प्रकृतीला एवढ्या मोठ्या कारणासाठी अधिक जपायल

नको का ? काय म्हणते मी ? ऐकताय ना ? उद्या मी जाते परभणीला. आणि इंजेक्शन्स घेऊन येते. नाही तर, चलता का तुम्ही पण ?'

'अगं पण मी रजा कुठं दिलीय? असं परस्पर कसं जाता येईल?'

'पाठवून द्या न रजा.'

'नको. रजा मान्य करून घेऊन मगच हेडक्वार्टर सोडलं पाहिजे. उद्या बघू, उद्या दुपारच्या गाडीनं जाऊ परभणीला. झोप तू आता. अन जेवलीस का ? जेऊन घे. मला भूक नाही.'

'तुम्हाला भूक नाही अन आम्ही काय दुष्काळातून आलोत का ? तुम्ही जेवणार नसाल तर मला पण जेवायचं नाही.

'बरं बाबा चल, दोन घास खाऊन घेऊ.' डायनिंग टेबलवर हात टकवून बसत मी म्हणालो.

'पिल्लं जेवली का ?'

'हो. मघाशीच. गुंडू तर झोपला पण.'

बायकोच्या समजुतीसाठी जेवलो थोडा. अंथरुणावर पडल्यापडल्या झोप लागली तर बरे होईल असे वाटले. विचारांची ही अनिरुद्ध यात्रा थांबेल तेव्हा ना! टी व्ही वरचे कार्यक्रम संपेपर्यंत काही वाटले नाही. पण त्यानंतर मात्र बेचैनी वाढली.

गुंडू तर लगेच झोपला होता. सोनू आणि शैलालाही झोपेची आराधना करावी लागली नाही. गुंडूचा झोपेत अतिशय शांत चेहरा असतो. त्याच्या आईसारखाच. लेकरं झोपल्यावर मला त्यांचा फारच लोभ येतो. मुके घ्यावे वाटतात, आवळावे वाटते. शैला नेहमी म्हणते, दिवसा लेकरांना चिडचिड करायची अन झोपल्यावर पुळका !

किती शांत झोपते शैला ! पाठीवर, शवासन केल्याप्रमाणे. खऱ्या अर्थाने सगळ्या शरीराला आराम मिळतो असं झोपले म्हणजे. मला तर या स्थितीत झोपणे सोडा, दहा मिनिटे पडूनसुद्धा रहाता येत नाही. डाव्या कुशीवर हाताची विचित्र घडी करून पालथे पडल्याशिवाय झोपच येत नाही. झोपण्याचे चोचले अन अटीही फार. उशी पाहिजे, गादी पाहिजे, पंखा चालू पाहिजे. सोनूची झोपही माझ्याच

सारखा अस्वस्थ अन बेशिस्त. उशिरापर्यंन्त झोप न येणे, झोपेतही सारखी चुळबूळ घुसमळणे. चेहरा 'चिंता करतो विश्वाची' वाला. तोंड उघडे राहिलेले.

हे कुत्राप्रकरण दोन दिवसात शिळे होण्याऐवजी वाढतच चालले आहे. ताजे होत चालले. चाव्याच्या जखमेची खपली घडते, डोळा उघडल्यासारखी जखम उघडते म्हणतात. तसे आपले होते आहे. मी सहज माझीही जखम पाहिली. खपली होती. सूजदेखील कमी झाली होती. नहीं के बराबर.

मोत्या बाहेर ठणाणा भुंकत होता. हा मोत्या या घरात रहायला आलो तेव्हा, लहानगा असताना आणला होता. शुभ्र पांढरा, पण अत्यंत मरतुकडा अन रोगट. त्याच्या पाठीच्या कण्याला बाहेरून लाल बारीक किडे पडलेले होते.

बायको माहेरी गेली असताना एक भीषण पंधरवडा एकाकीपणात तेव्हा घालवावा लागला होता. अंगात ताप, मनात संताप, कारण तारा करून बायको येत नव्हती. तेव्हा हा छोटा मोत्या मला चावला. चावला थोडे, पण वाईट फार वाटले. कारण आतील विषण्ण वृत्ती. तेव्हा ही कविता लिहिली होती.

मला कुत्रा चावलान.
ही प्रतिमा नसून सत्य, शुद्ध घटना आहे.
त्याची लस माझ्या अंगात खेळते आहे
ही दाद घेण्याची ओळ नसून तीव्र जाणीव आहे.
मी कुठलेही इंजेक्शन घेतलेले नाही
ही साम्यविरोधात्मक रूपक प्रक्रिया नाही.
मला केव्हाही हायड्रोफोबिया होऊ शकेल
'आपुले मरणं' शी याचा तौलनिक अभ्यास नको.
ते कुत्रं मरतुकडं होतं
हे यमक नसून मरण्याचे गमक आहे.
मी परवा नक्की मरेन
तरीही यात द्रष्टेपण किंवा इच्छामरण नसेल.

म. ग्रं. सं. ... ग्रंथालय शाखा.
... ग्रा.
दा. क्र. २६०४१ ... १८८७८
विषय वाचन ... क्र. ........

## शनिवार / ११ जानेवारी

सकाळी उठल्या उठल्या ठरवले की आज कुत्रोबांना पहायला जायचे. चावल्याचा आज तिसरा दिवस आहे. तो जर दहा दिवस वाचला तर सुखकर्ता दुखहर्ता. मध्येच गचकला तर दुखकर्ता सुखहर्ता म्हणजे चक्क वार्ता विघ्नाचीच की...

गचकला शब्दावरून उबाळेची आठवण झाली. उबाळेची संवेदना शब्दांच्या बाबतीत अतिशय तजेल असायची. अपरिचित शब्द भेटला की त्याला तो समजून घेण्याची विलक्षण ओढ असायची. तो ज्या घरात रहात होता त्याच्या मागच्या बाजूला वाडीकर नावाचे वकील रहात. उबाळेला उशिरा उठण्याची सवय. एक दिवस नऊ साडेनऊ वाजता समोरच्या ओटचावर ब्रश करीत असलेल्या उबाळेला शेजारी रहाणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले, 'सर, सकाळी वाडीकरची आई गचकली!'

पोरगा तर निघून गेला. पण इकडे उबाळेच्या सिग्रेटीमागून सिग्रेटी सुरू झाल्या. अकरा वाजता कॉलेजला आल्याबरोबर त्याने बाजूला नेऊन विचारले, 'वाडीकरची आई गचकली म्हणजे तिला नेमकं काय झालं असेल ? दचकली वगैरे असेल का ?'

उबाळेचे प्रॉब्लेम्स जेन्युईनच असत. तो विद्यार्थ्यांच्या होस्टेलवर रहात असताना घडलेला प्रसंग दुसऱ्याच दिवशी त्याने मला सांगितला,

'अरे, काल रात्री एकदीड वाजला होता तेव्हा सहज वर पाहिले

तर व्हेंटीलेटरमधून बांबू आत आलेला.'

'मग तू काय केलंस उबाळे ?'

'काय करणार ? वरून उलनचा रग अंगाच्या सर्व बाजूंनी घेऊन अंगाखाली मुडपून घेतला. घामाघूम झालो, पण काय करू ?'

'मग?' माझा श्वास रोखलेला.

'दहा एक मिनिटांनी हळूच पांघरूण काढले.' पहाता पहाता उबाळेचा चेहरा सदगदित अन कृतज्ञ झालेला. 'भारावलेल्या स्वरात म्हणाला, 'पुन्हा वर पाहिले–बांबू नव्हता.'

याच होस्टेलवरचा उबाळेचा आणखी एक प्रॉब्लेम म्हणजे अवती-भोवतीच्या रानातले मोठमोठे उंदीर उबाळेच्या झोपेत टाचा खायचे. मला हे खरे वाटले नव्हते. पण कुन्हाडकर नावाच्या आमच्या स्नेह्याने एकदा ते साग्रसगीत समजून सांगितले.

उंदीर टाचा करडतात याची कुन्हाडकरांनी नुसती ग्वाहीच दिली नाही तर त्यांचा संपूर्ण कार्यक्रम समजावून सांगितला. ; उंदीर अर्धा टाचेचा थोडा लचका तोडतो आणि तिथं नाकाने थोडं वारं घालतो. त्यामुळे आपल्याला 'गाऽऽर' वाटतं. पुन्हा थोडा लचका; त्यावर वारं अशा रीतीने सकाळपर्यन्त टाचेचा टवका निघतो.

तर आज कुत्रा पहायला जाणे हा महत्त्वाचा कार्यक्रम. मुलांना नेण्यासाठी गुलाब रिक्षा घेऊन येईल तेव्हाच त्याच्यासोबत जाऊ सायकलवर गेलो तर पुन्हा चावा ठरलेलाच आहे.

आंघोळ आटोपेपर्यन्त गुलाब आलेलाच होता, त्याला थोडं थांबायला सागून, तयार होऊन बाहेर पडलो. एक दिवसाची रजा पाठवून दिली.

वाटेत गुलाबची टकळी सुरू झाली. परवा मी सांगितला नाही तरी त्याला 'किस्सा कुत्ते का' कळालेला होता. गावात घडलेली कोणतीच घटना गुलाबपासून अज्ञात राहू शकत नाही. त्या कुत्र्याचा इतिहास गुलाब मला विस्ताराने सांगायला लागला, मोंढचात मारुतीचे देऊळ आहे. तिथले ते दोन कुत्रे आहेत. मोंढ्यात दुसऱ्या कोणत्याच कुत्र्याला ते फिरकू देत नाहीत. चांगले कुत्रे आहेत, सायकलस्वारांचे मात्र काळ

आहेत. वगैरे.

मुलांना शाळेत सोडल्यावर मी गुलाबला रिक्शा मोंढ्याकडे घ्यायला सांगितले. एका कोपऱ्यात अलिकडेच रिक्शा उभी करून आम्ही पायी चालत गेलो.

मोकळ्या मैदानात शहाबादी दगडाच्या थप्प्या लावलेल्या त्याच्या कुशीत दोन कुत्री पहुडली होती. एकाच रंगाची. हुबेहुब सारखी. यातले आपल्याला चावलेले कोणते? हा कुत्रा की तो कुत्रा? झालं! कुत्रा आयडेंटीफाय करता येत नाही! चौदा इंजेक्शने!

काहीसा विमनस्क होऊन मी रिक्शात बसलो.

थोड्या वेळाने जाणवले की रिक्शा घराऐवजी वेगळीकडेच चालला आहे. गुलाबला म्हणालो,

'अरे, इकडे कोणीकडे?'

'तुम्हाला माझं आज ऐकावं लागेल सर.'

मला काही कळेचना. पण मी त्याचं ऐकायचं एवढं मात्र ठरवलं. राज मोहल्ला या भागात कोणी कुरुम मियाँ खाँसाब यांच्याकडे आम्ही गेलो. बाहेर बैठकीत बसलो. खाँसाब आत असावेत. त्यांच्या मुलीने विचारले,

'कुत्ते ने काटा क्या?'

'हां.'

'सव्वा रुपय की खजूर लेके आव.'

गुलाब दुकानाकडे धावला. स्वतःच्या खिशातला सव्वा रुपया खर्चून त्याने खारका आणल्या. मी पैसे देऊ लागलो तर घेईना. गरीब माणसं प्रेमाने किती श्रीमंत असतात!

खारका आत गेल्या. थोडा वेळात कुरुम मिया खाँसाब आले. उंचापुरा माणूस. माझ्या हातात पुडी ठेवून म्हणाले,

'सात दिन् रोज एकेक करके खाना. सफेद कुछ खाना नही. सफेद कपडा पहेनना नहीं.'

मी हातात पुडी घेत खाँसाहेबांना शुक्रिया अदा केला. गुलाबने

फो...२

मला घरी आणून सोडले.

खारका भारून आणल्याचे बायकोला सांगताना खूपच मजा वाटली जेवायला बसल्यावर ताटात वाढलेला भात बाजूला सारताना कुरुम मियाँच्या शैलीत म्हटले, 'सफेद कुछ खाना नही, सफेद कपडा पहेनना नहीं.'

माझा चांगला मूड पाहून शैला खूप आनंदली, म्हणाली,

'आज तुम्ही रजा टाकलीच आहे तर चला नं आण्णांकडे जाऊ. आज परभणीलाच मुक्काम करून उद्या परत येऊ.'

आण्णा म्हणजे माझे सासरे. परभणीला नुकतेच शिक्षणाधिकारी म्हणून आलेले. जावयावर प्रचंड माया.

कविवर्य बोरकर परभणीच्या कविसंमेलनास आले होते तेव्हा माझ्याकडे दोन दिवस राहून गेले.त्यांना औरंगाबादपर्यन्त नेऊन सोडले तेव्हा सासरे औरंगाबादला होते, म्हणून बोरकरांचे त्यांच्याकडेच स्वागत, पाहुणचार केला. डॉ. सुधीर रसाळ, अनंतराव भालेराव आदींना बोलवले होते.अनंतरावांचा परिहास सुरू झाला,

'तुला बरे असे सासरे मिळाले. जावयाबरोबर त्यांच्या मित्रांचीही आवभगत करणारे. आमच्या सासरवाडीला तर आम्हालासुद्धा टिकू देत नाहीत.'

यावर माझे सासरे म्हणाले, 'अहो यांना आम्ही जावई मानतच नाहीत. मुलंच आहेत आमची ती.'

यावर बोरकर स्वत:च्या जावयांबद्दल बोलले ते फारच छान होते. कामत, वज्रम. लेकजावयांनी आजारपणात त्यांची केवढी काळजी घेतली. बोरी या गावात समुद्राच्या दलदलीची जमीन होती. बोरकरांना ब्रॉंकायटीसचा त्रास व्हायचा. तेव्हा सगळ्या जावयांनी मिळून त्यांना बेती आल्तला फ्लॅट घेऊन दिला. आमच्या सासऱ्यांचे सूत्र पुढे नेत बोरकर म्हणाले, जावई म्हणजे 'सन इन लॉ' नसून 'सन इन लव्ह' असं मी मानतो.' सर्वांनाच ही कोटी आवडली.

असे माझे सासरे. त्यांना पुस्तक अर्पण करताना मी त्यांच्या नावावर कोटी केली होती- 'ज्यांच्यामुळे माझ्या आयुष्यात 'राम,

आला.' ते सध्या परभणीला आहेत. आणि दर शनिवार-रविवार आम्ही तिकडे गेलेच पाहिजे, नसता पेनल्टी असे त्यांनी प्रारंभीच सांगून ठेवले होते.

संध्याकाळी ट्रेनने लेकराबाळांसह परभणीला पोहोचलो. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने रेल्वे स्टेशनपासून जवळच आहेत. म्हणून रिक्षा न करता पायी चालत निघालो. पोहोचल्यानंतर दिसले ते घराला कुलूप. 'आणि मनात शिणलेले हेतू शीण झाले.'

सगळ्यांना भुका लागलेल्या. नवीन निघालेल्या नीरज हॉटेलचे पदार्थ आम्हा सर्वांनाच आवडायचे. जेवण तर अत्युत्तम असे. म्हणून नीरजमध्ये जाण्याच्या मी सुचवलेल्या बेतावर बायको आणि लेकरंही खूष !

सगळे लटांबर घेऊन हॉटेल नीरजच्या वरच्या मजल्यावरील मिटींग हॉलमधे बसल्या क्षणी पोरांनी फर्माइशी घोषित केल्या.

सोनू – 'बाबा, मला आईस्क्रिम !'

गुंडू – 'बाबा, मला थम्सप !'

'ते सगळं जेवण झाल्यानंतर.' मी म्हणालो.

बायकोने निक्षून सांगितले, 'फक्त जेवणच हं.' मुद्दा लक्षात आला.

'छयॅ ! छयॅ ! सडा टाकल्याखेरीज का रांगोळी काढतात ? हे हा गडे, आज मी फार म्हणजे फार म्हणजे फारऽच बोअर झालोय.'

'मग जिमलेट तरी घ्या. ओळखू येणार नाही.'

'अग जीन पांढरी अन लिमकाही पांढरा. सफेद कुछ पहनना नहीं, सफेद कुछ खाना नही और सफेद कुछ पिना भी नहीं.'

वेटरला ओल्ड मंक आणायला सांगून मुलांसाठी जेवणं मागवली.

घरी परत आलो तोवर सासरे आलेले होते. विजू आम्हाला दारात पाहूनच ओरडली,

'काय भावजी ! जावयाला कुत्रं चावल्याचं कळलं म्हणून सास-

त्यांनी मुद्दाम जीप काढली. चला भेटून येऊन म्हणून. तर तुमच्या घराला मोठं कुलूप, शेजारच्यांना कुठं गेलात ते माहीत नाही. आम्ही गावात देखील सगळीकडे पाहिलं, सांगतानीकडे. फुलारींच्या ऑफिस-मध्ये. शेवटी आलो तडफडत–

'बरं विजू, जेवणाचं बघ बरं.' आण्णा म्हणाले.

'आम्ही जेवून आलो.' आम्ही दोघं.

'खरं म्हणता आहात की स्वयंपाक करण्याचा त्रास नको म्हणून म्हणता आहात ?'

'नाही, खरंच जेवलो. नीरजमध्ये.'

रात्री गप्पा सुरू झाल्यावर मी आण्णांना विचारले,

'आण्णा, फोबिया म्हणजे काय हो ?'

'फोबिया म्हणजे भीती. पण ज्या वस्तूची भीती वाटते ती प्रतीका-त्मक असते. तिची का भीती वाटते कळत नाही. मानसशास्त्रज्ञांना खूप प्रयत्न करून त्याचे कारण शोधून काढावे लागते ?'

'एक मुलगी टूथब्रश पाहिली की किंकाळी फोडून बेशुद्ध व्हायची. तिला टूथब्रशचा फोबिया झाला होत. खूप शोध घेतल्यानंतर असे लक्षात आले की त्या मुलीवर एका वृद्धाने बलात्कार केला होता.

'त्याच्या मिशा टूथब्रशसारख्या टोकदार व सरळ समोर वाढ-लेल्या होत्या. ती भीती तिच्या मनात दडून होती. त्यामुळे टूथब्रश पाहिला की ती भ्यायची. डॉक्टरला किंवा मानसोपचार तज्ज्ञाला भीतीचे मूळ आणि खरे कारण शोधून ती भीती पेशंटच्या मनातून हळूहळू कमी करण्याचे उपाय योजावे लागतात.'

हे ऐकताना आठवले, मीराला लहानपणी उडणारी म्हातारी पाहिली की भीती वाटायची. तिच्या आईनेच हे मला सांगितले. भयंकर घाबरायची, थरथर कापायची आणि मोठ्याने ओरडायची मीरा. त्यामुळे तिच्या वडिलांनी घरातले मोठे जुने पिंपळाचे झाड तोडून टाकले होते... मीराला कशाचा असेल फोबिया ?

सुर्वे वहिनींनी सांगितलेली लहान मुलांच्या फोबियाची दोन उदाहरणे आठवली. एका मुलीला गर्दीचा फोबिया झाला होता.

गर्दीला ती प्रचंड भ्यायची. घरातल्या माणसांना काही कळायचेच नाही की ती असं का करते ? अखेर शोधांअंती त्याचे कारण सापडले. ते असे की एकदा एक मिरवणूक पहावा पहाता ती मुलगी दारातून पायऱ्यांवर आणि पायऱ्यांवरून रस्त्यावर आली आणि गर्दीत बेदम तुडवली गेली. तेव्हापासून गर्दीचा तिला फोबिया झाला होता.

जंगलामध्ये सहलीला गेलेल्या कुटुंबातील लहान मूल फिरत फिरत भरकटले. पहाण्याच्या नादात आपण सर्वांपासून खूप दूर जातो आहोत याचे त्याला भानच राहिले नाही. भान आले तेव्हा नदीच्या प्रचंड मोठ्या प्रवाहासमोर अचानकपणे ते आले होते. असुरक्षिततेच्या भावनेने आणि भीतीने ते एकदम त्या पाण्याजवळ बेशुद्ध पडले आपण किती लांब आलो, चुकलो, आता आपली कुणाची भेट होत नाही या सगळ्या धसक्याने ते पाणी पाहून बेशुद्ध पडले. तेव्हापासून त्याला पाण्याची विलक्षण भीती वाटायची... हायड्रोफोबिया !

रात्री उशिरापर्यंत या सगळ्या गप्पा चालल्या गेल्या दोन दिवसात दुसरा विषयच नाही. एक तर दुसरा कोणी काढतो किंवा आपणच काढतो. आपल्याला खरेच झाले आहे तरी काय ?

काय हालचाल चालू असेल आपल्या शरीरात ? कुत्र्याची लस आत शिरली असेल तर कुठपर्यंत झाला असेल तिचा प्रवास ? ज्याला खरोखरीचा हायड्रोफोबिया होतो त्याला कुठल्या क्रमाने त्रास व्हायला आरंभ होतो ? प्रारंभिक लक्षणे काय असतील त्याची ? का एकदम टोपल्यातले पाणी पाहून ओरडण्यापासूनच सुरुवात ?

आपल्याला तरी अजून पाण्याकडे पाहून काही होत नाहीय. पण आपण पाहृचलेच कुठे पाण्याकडे ? आंघोळ करताना अंगाकडे लक्ष. पाणी पिताना प्याल्याकडे लक्ष. दादा कोंडकेच्या सिनेमात नायिका नवी साडी कशी आहे असे त्याला विचारते. तो म्हणतो, कुठंय साडी? तसे आपले पाण्याचे. दिसते तरी कुठे पाणी ? पाण्याच्या दिसण्यापेक्षा विचार करण्याचाच त्रास जास्त होतोय. पाणी... पाणी...

●

## रविवार / १२ जानेवारी

सकाळी उशिराच उठलो. डोके दुखत होते. एकदम दचकलो! कशामुळे दुखते आहे? लक्षणे सुरू की काय? पण लगेच शरमलो. कालचा हँग ओव्हर, दुसरे काय? सकाळी येणाऱ्या वृत्तपत्रासारखा हा हँग ओव्हर—

सब अखबार की करतनें
आज खाली बोतलों की तरह औंधी पडी हैं ।
मेरा गला सुख रहा है
और सारी देह इस तरह टूट रही है
जैसे कल रात पिये सपनों का हँग ओव्हर है

हँग ओव्हर हे बुद्धीला मिळालेले उत्तर. मन तेवढयावर समाधानी होते का? शेवटी आपल्याला खात्रीपूर्वक कळाले पाहिजे की हा हायड्रोफोबिया नाही. एकदा त्याची साद्यंत माहिती करून घेतली पाहिजे. मग आपला आपल्याला निर्णय घेता येईल की अमुक अमुक लक्षणे म्हणजे हायड्रोफोबिया. ती अनुपस्थित असल्याकारणाने हा हायड्रोफोबिया नव्हे! तसे असेल तर बाकी किरकोळ गोष्टींना घाबरण्याचे कारण नाही. हायड्रोफोबिया नसतानाच्या बाकी सगळ्या बाबी म्हणजे किरकोळच नाही का?

कोणाला विचारावे? उगीच कोण सांगेल आपल्याला? संगीताची जशी टयूशन लावता येते तसे हायड्रोफोबियाचे थोडेच आहे?

एकदम डॉ. मधूची आठवण झाली. परभणीच्या दवाखान्यात तर आहे तो इंटर्नशीपसाठी. भेटू त्याला जाऊन. एकदा का शास्त्रशुद्ध माहिती आपल्याजवळ जमा झाली की प्रश्नच मिटला ! उगाच पागल पणा करून डोक्यात राख घालण्यात अर्थ नाही. आपला अस्वस्थ-पणा शैलाच्या नजरेतून सुटणार नाही. पुन्हा ती परेशान–

हम है मुश्ताक और वो बेजार
या इलाही यह माजरा क्या है
दिले नादाँ तुझे हुआ क्या है ?
आखीर इस दर्द की दवा क्या है ?

खरेच, याचे निदान काय ? याला उपाय काय ? एकदा कळालेच पाहिजे.

झोपेतून उठल्यापासून अस्वस्थ आहे. आमची नातेवाईकांतील प्रतिमा हा हा ही ही हू हू करणारा अशी. त्यामुळे हा उदास मूड काही फार निभणार नाही. त्यामुळे थोडा वेळ बाहेर जाऊन चेहरा लपवलेला बरा !

काही तरी कारण सांगून सटकलो. रिक्षा करून सरळ मधूकडे जायचे ठरवले. रविवारी दवाखाना आणि ओपीडी बंद असल्याने तो क्वार्टर्सवरच भेटेल.

बऱ्हाल, मधू खोलीवरच होता.

'काय सर, कोणीकडे ? या, बसा' मधूने त्याच्या मित्रांशी ओळख करून दिली. पण ते लवकरच सटकले. मलाही तेच हवे होते. मी चेहरा शक्यतो शांत ठेवत म्हटले,

'मधू' तुला तर माहीत आहे, मला कुत्रा चावला ही गोष्ट मी खूप लाइटली घेतो आहे. त्यात चिंता करण्यासारखे तसे काही नाही. पण माझ्या मनात असा विचार आला की हायड्रोफोबिया या विषया-वर का न एक झकास कादंबरी लिहावी. मराठीत असा प्रयत्न अजून कोणी केला नाही. मी जर लिहीन तर अभ्यास करूनच लिहीन. मराठी लेखकांवर असा एक आरोप केला जातो की इंग्रजीतला बेस्ट सेलर कादंबरीचा लेखक आपल्या पुस्तकावर जेवढी मेहनत घेतो,

तेवढा मराठीचा उत्तम कादंबरीकार देखील घेत नाही. माझ्या नियोजित कादंबरीत अशी तक्रार करायला जागा राहू नये. म्हणून तू मला हायड्रोफोबियाबद्दल तेवढी माहिती दे जी एका एम. बी. बी. एस. झालेल्या डॉक्टरला असते.'

मी बोलताना ते मधूला खरे वाटावे याचा यथाशक्य प्रयत्न करीत होतो. आपली भीती व चिंता हास्यास्पद ठरू नये म्हणून मी कादंबरीचे निमित्त पुढे केले. मधूला मी खरोखर कादंबरी लिहिणार आहे याविषयी अविश्वास वाटला नसावा. शेवटी गुरू आहे मी त्याचा. तो मला खोटे कसा समजेल? आणि या घाणीतून जर खराच बाहेर पडलो तर लिहीन की कादंबरी! त्यात काय एवढे! पण हे म्हणजे नवस बोलल्यासारखेच झाले. हायड्रोफोबिया, मला हायड्रोफोबिया होऊ देऊ नकोस; मी तुझ्यावर कादंबरी लिहीन.

मधू म्हणाला, 'आम्हाला अभ्यासाचं पुस्तक होतं. त्यात रेबीज-विषयी विस्तृत माहिती आहे, मी उद्या अबाजोगाईला जाणार आहे. मेडीकल कॉलेजच्या लायब्ररीतून किंवा एखाद्या विद्यार्थ्याचं मिळालं तर ते पुस्तक आणेन.'

'नक्की आण ह! कधी येणार आहेस तू परत?'

'पुस्तक मिळालं की!' मधू हसत म्हणाला.

'ठीक आहे. चलतो मी.'

'सर, चहा वगैरे?'

'नको, घरी जेवणासाठी सगळे वाट पहात असतील. चलतो.'

घरी आलो. जेवणबिवण कसेबसे उरकले, मूड ठीक नाही हे पाहून कुणी फारसे वाटेस गेले नाही. दीडच्या ट्रेनने गावी परत जायचे हे जाहीर केले. थांबण्याचा आग्रह. त्याला निग्रहपूर्वक नकार. पुढच्या शनिवारी पुन्हा नक्की येऊ असे आश्वासन आणि रेल्वेस्टेशन गाठणे.

गाडी सुरू झाली आणि शैलाने झोपायला आरंभ केला.

'आज तुम्हाला झाल तरी काय? सगळे विचारत होते जावई आज गप्प गप्प का आहेत? नेहमी एवढ हसता, खिदळता. आज

विजूची काही थट्टामस्करी केली नाही. ती म्हणत होती, भावजी आज असं का वागताहेत ? आण्णा म्हणाले, 'माझी प्रमोशनची ऑर्डर केव्हाही येऊ शकते. ते आता डेप्युटी डायरेक्टर होणार डेप्युटी डायरेक्टर म्हणजे विभागीय कार्यालयातच अमरावती-कोल्हापूर अशी पोस्टींग मिळणार. मी इथं आहे तोवर तुम्हा सर्वांचा जास्तीत जास्त सहवास मिळावा. पुन्हा कित्येक महिने भेटीसुद्धा होणार नाहीत.'

मीच एकटी टकटक करतेय. तुम्ही बोलत का नाहीत ?

पन्नास मिनिटात गाव येणार होते त्याप्रमाणे ते आले. मायला ! आता हा तापच झालाय. आपली उदासी लपवण्यासाठी प्रत्येकाला चुकवण्याचा. शैलाला किती वेळ चुकवता येणार. का कुठं घर सोडून खरेच जावे का ?

घरी गेल्यावर लेकरे खेळायला गेली. आज रविवार. टीव्हीवर पिक्चर त्यामुळे शैला टीव्हीला तोड लावून बसली आणि मी ताना-तून सुटलो.

पडल्या पडल्या विचार आला खरेच आपण मेलोबिलो तर एखादी पॉलिसी देखील काढलेली नाही. लेकरांकरिता काय ठेवून जाणार ! कर्जात हाऊसिंग फायनान्सकडे गहाण असलेले हे घर. आणि लहान-मोठी इतर दोन-तीन कर्जे पी. एफ. पीपल्स बॅन्क व देना बँकेचे उद्या प्रा. राठींना भेटून आयुर्विमा तरी काढू.

टीव्हीवर कोणता सिनेमा आहे याकडे देखील आज माझे लक्ष नव्हते. इंटरव्हल झाली तेव्हा अवधी होता म्हणून स्वयंपाकाचे पाहण्यास म्हणून शैला उठली. परभणीहून सासूबाईंनी पोळ्या दिलेल्या होत्याच. भाजीपिठलं असे काही तरी करते म्हणाली. मी काहीच बोललो नाही तेव्हा चिडली,

कुठं लक्ष आहे तुमचं ?

माझे भेदरलेले डोळे टीव्हीकडे लागले होते. यू अॅण्ड युवर पेटस मध्ये कुत्र्यासबंधीच कार्यक्रम होता. कुत्र्याला अॅन्टीरेबीज इंजेक्शन कधी द्यायला पाहिजे वगैरे ..हा कार्यक्रम इथे ना का बरे असतो.

का फक्त इंग्रजी बोलणारेच कुत्रा पाळतात? देशाची राष्ट्रभाषा हिंदी आहे. हिंदीत माहिती दिली तर खेड्यापाड्यातल्या माणसांना सुद्धा कळेल. त्यांना नको का कळायला? का खेड्यातल्या माणसांना चावू देत पिसाळलेला कुत्री? त्यांना होऊ द्यायचा का हायड्रोफोबिया? इंडिया आणि भारत ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत हे शरद जोशीचे म्हणणे बरोबर आहे.

शैलाच्या म्हणण्याकड पूर्ण अवधान देण्यासाठी म्हणून मी टी.व्ही. बंद केला. पण दरम्यान तिच्या लक्षात आलं मी कुत्र्यावरील कार्यक्रमाने बेचैन झालोय म्हणून.

तसे नाही गं. या निमित्ताने जर एका महत्त्वाच्या प्रश्नाचा थोडासा अभ्यास केला तर काय हरकत आहे? आज मी मधुलासुद्धा म्हणालो, मला जरा याची माहिती करून दे म्हणून.

मधुकडे गेला होता? कधी?

सकाळीच.

सांगितलंसुद्धा नाहीत. चोवीस तास का आता हाच ध्यास घेऊन बसणार? तुम्हाला सतत अस्वस्थ व्हायला काहीतरी कारणच पाहिजे. बसा आता त्यातच डोकं घालून. शी - काय विषय मेला गच्च्याळ! काय झालं गळ्यावरून हात फिरवायला?

'घसा दुखायलाय'

'हे पहा तुमचं सगळं मानसिक आहे. कुणी काही तरी सांगणार आणि तुम्हाला तसंच होतंय असं वाटणार. जरा शांत रहा आणि सारखा विचार करू नका.'

•खरेच आपले असे होतेय का? डोकं हँगओव्हरमुळे दुखवत्येय तसा घसादेखील इतर कारणाने दुखत असेल.

शैलाच्या मुद्यांवरून एक गोष्ट आठवली एक तहानलेला, भुकलेला वाटसरू कल्पवृक्षाखाली जाऊन बसला. प्रवासाने त्याला खूप शीण तर आला होताच. थंडगार सावलीत त्याला बरे वाटले. त्याच्या मनात विचार आला.

अहाहा! काय छान सावली आहे. आता मला जर थंडगार पाणी

प्यायला मिळाले तर काय बहार होईल.

असा विचार मनात यायचा अवकाश. थंडगार पाण्याचा तांब्या-पेला समोर हजर.

त्याला एवढी तहान लागली होती की कसलाही विचार न करता पाणी पिऊन तो शांत झाला. पाणी प्यायल्यानंतर त्याला त्याच्या भुकेची तीव्रतेने जाणीव झाली. आपल्या मनाशी तो म्हणाला, 'पाणी तर मिळालं, आता छानपैकी जेवण मिळालं तर किती बरं होईल.'

—की लगेच पंचपक्वान्नाचे भोजन हजर. त्याने आपली क्षुधा शांत केली. हे सर्व होऊन गेल्यानंतर त्याच्या डोक्यात शंका आली की सगळं ठीक आहे. पण हे घडलं तरी कसं ? इथं एखादा राक्षस तर नाही ?

की साक्षात राक्षस समोर हजर.

इथपर्यंत ठीक होते. पण त्या राक्षसाला पाहाताच त्याला वाटले. खरंच राक्षस आहे की ! आता हा मला खाणार तर नाही ?

असा विचार येण्याचा अवकाश त्या राक्षसाने त्याला खाऊन टाकले.

मन चिंती ते वैरी न चिंती म्हणतात ते असे. आणि खाली दिमाख शैतान का घर असते.

काही खरे नाही. उद्यापासून सर्व वर्गाचे एक्स्ट्रा पिरीयडस घेण्यास आरंभ करू. स्वत.ला प्रचंड गुंतवून घेतले पाहिजे.

ग्रंथालय शाखा.
आ. क्र. 2867 दि. 18/7/82
विषय कथा

# सोमवार / १३ जानेवारी

सकाळी जाग आली तेव्हा अंथरुणातच ठरवले की त्या घाणेरड्या विचारांचे मळभ दूर सारायचे. आजपासून फ्रेश रहायचे. काय फालतू-पणा चाललाय साला. आपण परेशान. बायको परेशान. लेकरांना जवळ घेणे नाही की त्यांच्या सुंदर डिस्नेलॅण्डमध्ये जाऊन गप्पागोष्टी नाहीत. हे काय चालवलंय ? बस्स झाले आता

खिडकीकडे नजर टाकली तर काय. काळाकुट्ट अंधार. च्यायला, आपण रामप्रहरातच जागे झालो की काय आज ? म्हणजे हे शकुन लक्षणच आहे. नव्या चांगल्या दिवसाची सुरुवात भल्या पहाटे उठून घड्याळात पाहतो तर साडेसात ! चांगलाच दचकलो. ताडकन उठून व्हरांड्यात आलो. पहातो तर काय काळभोर ढग आकाशात दाटून आलेले. बापरे ! आजच मी सावरणार होतो तर हा निसर्गाचा तडाखा.

अभी खाके ठोकर सँभलने न पाये
के फीर खायी ठोकर सँभलते सँभलते ।

मला सर्दीचा लहानपणापासून त्रास आहे. अॅलर्जीची सर्दी. सर्व मोसमात बहुदा पडसे-खोकले चालूच असते. ब्रह्मानंद देशपांडे म्हणा-यचे वर्षातून मला फक्त दोनदा सर्दी होते. पण ती सहा-सहा महिने राहते. धूळ, आंबट आणि सर्द हवा या तिन्हींनी मला हमखास सर्दी होते. सध्याच्या या कॉम्प्लीकेशनमध्ये तरी ही पावसाळी हवेची भान-

गड नको होती.

पुन्हा घरात आलो. शैला आणि लेकरे अजूनही शांत झोपेत होती प्रेमाचा एक प्रचंड कढ घशात दाटून आला. किती सुंदर आयुष्य चालले होते आपले यांच्यासह. नशिबात पुढे काय वाढले आहे कुणास ठाऊक! खरंच मला जगायचेय. खूप खूप आणि खूप छान जगायचेय. किती तरी अजून शिल्लक आहे.

हजारों ख्वाहिशे ऐसी
के हर ख्वाहिश पे दम निकले

कौटुंबिक, सामाजिक कितीतरी महत्त्वाकांक्षा व जबाबदाऱ्या पार पाडायच्यात. अगदीच क्षुद्र कीटक नाही मी. काहीतरी वेगळी मूल्ये घेऊन, वेगळी प्रतिभा घेऊन जगणार आहे. पण अजून भरीवपणाने, ठोसपणाने काही निर्माण करता आले नाही शिक्षण, नोकरी आणि स्वत:च्या पायावर उभ राहणे, लग्न, मग दोन लेकरे आणि कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया, घर बांधणे, बी. एड चालूच आहे सगळे काही. आता तर कुठे स्थिरावलोय, विवंचनामधून, अस्थिरतेमधून. किती तरी गोष्टी अजून शिल्लक आहेत. सगळेच बाकी आहेत.

कट गयी उम्र मेरी तो मुझे पता यह चला
जिंदगी सिर्फ कटी है इसे जिया ही कहाँ

आता जर मला आयुष्य मिळाले तर मी एकेक दिवस मोलाचा, सोन्यासारखा मानून जगेन. आळस, निष्क्रियतेत फुकट वेळ घालवणार नाही. किती मनासारखी परिस्थिती आणि माणसे मिळाली मला. शैलाशी लग्न ठरले तेव्हा रसाळसर मला म्हणाले होते तुम्हाला खऱ्या अर्थाने बौद्धिक साहचर्य देऊ शकेल अशी मुलगी आहे ती. खरेच आठ वर्ष किती सुखात, आनंदात गेली. सोनु, गुंडूसारखी गोड दोन फुले आमच्या यासंसार वेलीला आलेली. आता तर महफलीत रंग भरत होता आणि तेवढ्यात ..

इतुक्या लवकर येई न मरणा
मज अनुभवू दे या सुखद क्षणा

फारच बेचैन वाटायला लागले. सिगरेट ओढू या का? शैला झोप-

म. ग्र. स.

लीय तोवर दुकानावरून आणून ओढून टाकावी. तसेच दार लोटून व स्लिपर घालून दुकानावर गेलो. सिगरेट पेटवून पुन्हा परत घराकडे निघालो. सर्द हवा होती. रात्री कुठं तरी पाऊस झाला असला पाहिजे थंडीदेखील जाणवली. खुर्चीवर बसून दुसरा तिसराच झुरका घेतला नसेल इतक्यात शैलाकडे लक्ष गेले तर ती जागी आणि माझ्याकडे पहाते आहे.

काय झालं ?

कुठं काय ?

सिगरेट का ओढता आहात ?

सहज. अग बाहेर बघ किती वेगळे वातावरण आहे. थंडी आणि पावसाळी हवा ऐसे में मौसम का तकाजा है की सिगरेट पी जाय.'

अहो पण तुम्हाला सहन होत नाही म्हणून तुम्ही सोडली होती ना?

अग अजून तरी कुठ धरलीय ? मार्कट्वेन एकदा म्हणाला होता लोक दारू पिण्याचा एवढा बाऊ का करतात कळत नाही. मी तर कैक वेळा दारू पिणं सोडून दिलेलं आहे.'

'बरं बरं उठल्या उठल्या लेक्चरबाजी सुरू करू नका.'

'तू आता उठलीस. मी कधीचा उठून फ्रेश झालो.'

म्हणून कपाळावर आठ्यागाठ्या घालून सिगरेट ओढणं चाललं होतं.

या शैलापासून काहीही लपवणे कठीण आहे. जाऊ द्या. सोनू-गुड्डू कुठल्या कुठे झोपले होते. त्यांना चोंभाळायला लागलो.

'झोपू द्या हो, त्यांना छान छान स्वप्न पडत असतील.'

'आणि लेकरांची स्वप्नं रंगीन असतात म्हणे. आपली ब्लॅक अॅण्ड व्हाईट तुला आठवतात का ग स्वप्न पडलेली? बोरकरांना आठवायची रंगीत स्वप्नं. त्यांचा तर ललित निबंधच आहे. मला पडणारी स्वप्नं. फार मस्त—मी म्हणालो. काय झालंय कुणास ठाऊक. उल्हासाने हसरतभरी नजरेने प्रसन्नता टिकवून बोलण्याचा प्रचंड शीण येतो आहे. अवघड आहे नाटके करणे.

खोलवर श्वास घेण्याचा व हळूहळू निःश्वास टाकण्याचा सराव

करत होतो. चेहऱ्यावर अस्वस्थता कधी तरी आली असावी. पुन्हा शैलाचा प्रश्न.

काय झालं ?

कुठं काय ? श्वसनाचा व्यायाम करत होतो. त्रास होतोय असं का होत असेल ?

आज काही नवीन वेगळं आहे का ? सकाळी तुमचं नाक चोक झालेलेच असते. आणि तुम्ही आता सिगरेट ओढलीय. कठीण आहे बाबा तुमच्या अस्वस्थ होण्याचं !

मी उगीचच खजील आणि नर्व्हस झालो. आपले विश्राम बेडेकरांच्या ' वाजे पाऊल आपुले सारखे होतेय. पण तिथे डायग्नोसिसबद्दल समजुतीचा घोटाळा होतो. ऐकण्यातली गफलत. मला तर खरोखर कुत्रा चावलाय. ही जखम अजून पिंढरीवर आहे. त्याची लस माझ्या शरीरात खेळते आहे. निर्णायक अवस्थेला कधीही येऊ शकते प्रकृती.

दाढी-आंघोळ करून लवकरात लवकर सटकावे कॉलेजला. म्हणजे हिच्या निरीक्षणातून आणि प्रश्नांच्या भडीमारातून तरी सुटका होईल.

कॉलेजमधे गेलो. टपालाच्या बोर्डावर वसुधाचे पत्र लटकत होते. माझ्या कुत्र्याच्या भाषेत लिहिलेल्या पत्रास उत्तर. सुरवात होती.

व. भावोजीस

हाड हाड हाड...

किंचित मजा वाटल्यासारखे झाले. पण क्षणभरच. आज कुणाशी हॅलो हॅलोच्या पलीकडे बोलावंही वाटत नव्हते. काही आभाळाकडे आणि काही पुस्तकात पहात कसेबसे पिरीयडस् संपवले. श्रीकांत साडेतीनच्या सुमारास म्हणाला.

हं काय लेखकराव, चलायचं का ?

चला.

सायकली बाहेर काढून आम्ही स्लो सायकलिंग करत निघालो. रोज असेच सोबत जातो. किती गप्पा करतो. आज बात बनी नही रही...

काय ढगानं त्रास व्हायला लागलय.

अरे बाप रे ! तुला या ढगानं रेस्टलेस वाटतय का ? या ढगात तर पाणी आहे. श्रीकांत

पाणी...बेचैनी...म्हणजे आपल्याला हायड्रोफोबिया...

मी चूप झालो. गंभीर झालो.तो कदाचित गमतीने म्हणाला असेल. पण माझ्याकडे पाहून पुन्हा सिरीयस झाला.

' हे पहा तू कशानंही मर पण तुला काही हायड्रोफोबिया होत नाही.

कसं काय ?

नाही होत.

मला जरा बरे वाटले. नाक्याजवळ सायकल वळवत मी म्हणाल्लो.

यार आज जरा मेंदूचा साबण घेईन म्हणतो. चलायचं का ? पिशवीत टाकू की निघू.

माझ्याकडे शिल्लक आहे.

मग मी चलतो.

अच्छा.

हॉटेलमधे गेलो. ओल्डमंक मागता मागता म्हणालो- सर्दी अन घशाचा फारच त्रास व्हायला नको.

अहो मग तुम्ही ब्रॅण्डी घ्या. रम नका घेऊ.

ठीक आहे. द्या मग.

त्याने दिलेले पार्सल पिशवीत टाकले. घरी पोहचतो तोच रिक्शातून शैला मुलासह उतरताना.

आँ ! कुठे गेली होतीस ?

परभणीला.

परभणीला ? कशाला ?

तुमची इंजेक्शनं आणायला.

मी चाट पडलो.

'सकाळी डॉ. जोशींकडे गेले त्यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांच्या नावे चिठ्ठी घेतली. परभणीला आण्णांनी

थर्मास मिळवून दिला त्यात बर्फ टाकून ही इंजेक्शने आणली लगेच सेलूला आले. थर्मासमधून इंजेक्शने डॉ. जोशींकडे दिली त्यांनी लगेच फ्रीजमधे ठेवली तुम्हाला उद्या सकाळी यायला सांगितलंय. उद्यापासून कोर्स सुरू.

मी थक्क होऊन ऐकत होतो. केवढी धडपडी आहे ही. आणि मनकवडी तरी किती.

मला भरून आले. खरंच सुरू करूयात उद्यापासून इंजेक्शने.

हातपाय तोड धुवेपर्यंत वसंत जोशी आला. कुंडलवाडीहून औषध आणलंय.

आँ ! कधी गेला होतास ? कधी आलास ?

आता थ्री डाऊनला.

अरे मग हीदेखील त्याच गाडीत होती नं–

मी नांदेडहून वसलो नं, मला काही वहिनी दिसल्या नाहीत.

बस, बस, अग चहा कर ग. पहा माझ्या या मित्रानं कुंडलवाडीहून औषध आणलंय.

शैलाने औषध ताब्यात घेत पाण्याचा ग्लास जोशीच्या हातात दिला. तिच्या आवाजात, नजरेत कृतज्ञता दिसत होती.

कस द्यायचं हे औषधं ?

सकाळी काहीही खाण्यापूर्वी अनशापोटी द्यायचे. अर्धा कप दह्यात मिसळून. तीन पुड्या तीन दिवस. उद्यापासून सुरू करा.

मला खूप बरे वाटले. कुणालाही न सांगता कधी हा कुंडलवाडीला गेला अन त्याने औषध आणलेदेखील. दोस्त किती प्रेम करतात. किती काळजी घेतात आपली. बायकोने अँण्टीरेबीज व्हॅक्सीन आणले. याने आयुर्वेदिक जडीबुटी आणली. तिवारीचे होमियोपॅथिक औषध येईल. रिक्शावाल्या गुलाबने भारून दिलेल्या खारकादेखील घेतल्या. डरनेकी कोई बात नहीं.

तीन तीन पॅथी आणि चावा फक्त एक. आपण मरत नाही.

चहा घेऊन थोड्या गप्पा टप्पा करून जोशी निघून गेला.

फो...३

दरम्यान शैलाला माझ्या शबनममधील पार्सलाचा शोध लागला

'हे कशाला आणलंत ?'

उत्तर देणं कठीण आहे. तरी प्रयत्न करणे भाग आहे.

'अगं, आज तू परभणीला गेली होतीस. चिंताही कसली उरलेली नाही. आता. राहिलेली तिसरी गोष्ट नसेल तर तो एकांत का चांगला असतो.

तुम नही गम नही, शराब नही
ऐसी तनहाई का जवाब नही.'

'बस, बस. मी परभणीला जाणार आहे हे काही तुम्हाला माहीत नव्हतं. आणि तुम्ही घरी येण्याआधी तर मी हजर आहे. ते राहू द्या. आता या तिन्हीपैकी मी तर आहे ना. मग हे पार्सल आता कपाटात ठवून देते.'

यावर जागच्या जागी चडफडण्याखेरीज मी काय करू शकत होतो ?

शैलाने अजून एक वेगळा कार्यक्रम सुचवला. सिनेमा पहाणे हा. खरोखर कित्येक दिवसांपासून सिनेमा पाहणे जमलेच नाही. शैलाने स्वयंपाकही करून ठेवला होता. त्यामुळे फर्स्ट शो पहाण्यास काही अडचण नव्हती मी म्हणालो,

'कल्पना चांगली आहे. खरंच जाऊ या. पण सिनेमा कोणता आहे ?'

'तेरी मेहरबानीया असं काही तरी पोस्टर होतं.'

'असो कुठलाही. काही तरी कथा असेलच ना ? निदान चित्रं तरी हालतीलच ना ? ठरलं तर मग. आवर बर तू, मी मुलांचे कपडे बदलतो. चला रे, सोनू, गुंडू ऽ. आज आपल्याला सिनेमाला जायचंय.'

हे ऽऽऽ' करीत मुलांनी आनंद व्यक्त केला.

टॉकीजमध्ये पाय ठेवला तेव्हा सिनेमा सुरू झाला होता. अंधारात धडपडत बसलो एकदाचे. समोर जॅकी श्रॉफ जीप चालवत होता.

त्याच्या जीपखाली एक कुत्रे आले. ते उचलून त्याने घरी आणले. मग दोघांची दोस्ती सुरू त्याला जवळ घेऊन 'तेरी मेहेरबानीया ऽऽ' वगैरे गाणे म्हणणे. अरे बाप रे ! तेरी म्हणजे त्या कुत्र्याचे सर्वनाम. 'कुत्र्याचे उपकार ?' म्हणजे संबंध सिनेमा कुत्र्यावर ! ! घ्या ऽ, ज्याच्यापासून पळायचे त्यानेच गाठले की ! आता तीन तास त्याच्याच तावडीत.

एक मनुष्य निर्जन रानातून एकटा चालला होता. पोर्णिमेची रात्र. डोळ्यांना दिसणारे चित्रविचित्रं आकार. आसपास चिटपाखरूंही नाही. मनातून अतिशय भेदरलेला. शक्य तेवढा वेग वाढवून हा रस्ता पार केला पाहिजे या प्रयत्नात झपाझप चाललेला. बुडत्याला काडीचा आधार तसा त्याला एक मनुष्य भेटतो. एकदम हायसे वाटते. त्याच्याशी बोलून मनावरचे दडपण कमी करता येईल अन्यथा या स्मशानशांततेत भुताखेरीज कुणीच नव्हते. लांववर दिसलेल्या त्या माणसाजवळ वेगाने अंतर कापीत तो पोहचला. काही तरी सुरुवात करायची म्हणून त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, 'माचीस आहे का का हो ?'

काही न बोलता समोरच्या माणसाने काडीपेटी पुढे केली. हा पहातो तर काय, त्याला हाताऐवजी खूर !

मोठी किंकाळी फोडून तो धावत सुटला. मागे देखील वळून न पहाता सुसाट पळत सुटला. खूप वेळानंतर त्याला एक बैलगाडी दिसली. पाठमोरा गाडीवान दिसला. त्याने श्वास टाकला आणि मोठमोठ्याने हाका मारून त्या गाडीला थांबवले. सुदैवाने गाडी थांबली. हा पटकन गाडीत चढून बसला. इतक्या विलक्षण अनुभवातून तो गेला होता की त्याला ओळख करून घेण्याइतका दम नव्हता. थोडी धाप कमी झाली की तो त्या गाडीवानाला म्हणाला,

'काय भयानक प्रसंग पहा. स्मशानात एकाला माणूस समजून मी माचीस मागायला गेलो. त्याने माचीस देण्यासाठी हात पुढं केला तर त्याच्या हाताला खुरं.'

गाडीवानाने मागे वळून पाहिले.

शांतपणे आपले दोन्ही हात त्याच्यापुढे करत गाडीवानाने विचारले,

'अशीच होती का ती खुरं–'

मला कुत्र्याने त्या गाडीवानासारखेच आज टॉकीजमध्ये गाठले आहे.

माझी चुळबूळ शैलाच्या लक्षात येत असावी. अधून मधून ती माझ्याकडे रोखून पहात होती. ताप नसता मरेल छाप! शेवटी 'पान आणतो' असे सांगून मी उठलो.

टॉकिजच्या बाहेर आल्यावर जर बरे वाटले. कुणी तरी भेटावे या इच्छेने इकडे तिकडे पाहिले. गप्पा मारत वेळ काढावा असे कुणी नव्हते. पानपट्टीजवळ गेलो. तिथल्या गर्दीत माझा नंबर शेवटी येईल असा उभा राहिलो. नंतर आलेल्यांना देखील आधी पान घेऊ द्यायची असे धोरण ठरविले.

'सर, पान' पानपट्टीवाला बिनखुराचे हात पुढे करीत.

'अं ? हो. असंच एक बांधून द्या. दोन्ही बांधूनच द्या.'

त्याला पैसे देऊन आणि पानं खिशात टाकून मी पुन्हा इकडे तिकडे नजर टाकली. टॉकीजमध्ये परतण्याखेरीज पर्याय नव्हता. पुन्हा मेहेरबानीया करणारा कुत्रा आठवला आणि वेगाने एका बियर-बारकडे निघालो. झप्पकन एक बियर संपवली आणि पुन्हा टॉकीज-मध्ये.

इतका वेळ ?' एवढे विचारून माझे उत्तरही न ऐकता शैला सिनेमामध्ये गढली. बहुधा कथानकाने गती घेतली असावी. मी काही न बोलता पान पुढे केले आणि समोर नजर टाकली: पावसात जॅकी श्रॉफ आणि पुनम धिल्लाँ गाणे म्हणत होते.

हा काय चमत्कार आहे ? त्यांच्याकडे पहाण्याऐवजी रस्त्यातल्या पाण्याकडे, ओघळणाऱ्या धारांकडेच लक्ष जाते आहे. पुन्हा मेंदूत तीच सळसळ. पाण्याकडे पाहिल्याने आपल्याला काही होत नाही याची खात्री करून घेण्यासाठी म्हणून पहावे तर अजूनच धीर खचतो आहे. आपल्याला काही तरी होते आहे खास. पण कशाने? झपकन प्यालेल्या

बियरने का समोरच्या जलदर्शनाने ?

शेवटी डोळे मिटून पडून रहाण्याचे ठरवले. सिनेमा संपला तेव्हा शैला म्हणाली,

'चला. झोपलात की काय ?'

'चला.' मी लगबगीने उठलो. आता हिने प्रश्नांचा अधिक भडीमार करू नये म्हणून मीच विचारले,

'मी बाहेर गेलो तेव्हा काय झाले ग स्टोरीत ? नंतर आलो तेव्हा लिंकच लागत नव्हती.'

शैलाने स्टोरी सुरू केली. ती संपायच्या आत रिक्षाने घर गाठले.

जेवून अंथरुणावर पडलो. आता तर रात्र म्हणजे राक्षसी विचारांचे अभयारण्य लागणार तसे ते लगेच लागलेही.

सिनेमातले पावसाचे दृश्य पहाताना आपल्याला खरेच काही झाले का ? पावसाळी ढगांनीही आपण बेचैन झालो होतो. आज पडद्यावरचा पाऊस अस्वस्थ करून गेला. अर्थात तो बियरचा परिणाम असायची देखील शक्यता आहे. सकाळी, असर ओसरल्यावर, एकदा नीटपणे पाण्याकडे पाहिले पाहिजे.

शैला गाऊन घालून आली. आता काही तरी माहौल पैदा केले पाहिजे. म्हणालो, 'ए, आज भोगी आहे. आज भोगी तो सालभर भोगी. नही तो सालभर नहीं. काय ?'

हे मी बोलत असताना तिने मुलं झोपल्याची खात्री करून घेतली. मला म्हणाली, 'थोडी आवराआवर करून आणि ओटा धुवून येते ? थांबा.'

शैलाचे कधी आवरले माहीत नाही. मला मात्र डाराडूर झोप लागली.

●

## मंगळवार / १४ जानेवारी

सकाळी सकाळी सोनूची भूणभूण चाललेली होती. आज आम्हाला बाईंनी तीळगूळ आणायला सांगितलाय. तिळाचे लाडू दे, वगैरे. गुंडू म्हणत होता, मला पण दे. शैला मिक्सरवर काही तरी करत होती.

झोपेतून उठलो की मला शिंका सुरू झाल्या. डोकेदेखील फारच दुखत होते. तोंड धुऊन चहासाठी डायनिंग टेबलवर ठाण मांडून बसलो तरी चहाची काही हालचाल दिसेना. मग चिडलो.

चहाऐवजी, बायकोने कपात कसले तरी कालवलेले हिरवेगार रसायन समोर आणून ठेवले त्यामुळे तर माझा पारा अजूनच वाढला. एकदम ओरडलो,

'काय आहे हे ?'

'अहो असं काय करता ? कुंडलवाडीचं औषध नाही का सुरू करायचं आजपासून ?' शैला समजुतीच्या स्वरात म्हणाली.

मी चमचाभर चाखून पाहिले. अतिशय वाईट, न खावणारी चव होती. हिरव्या पाल्याचे दह्यात कालवूनही आपसात काही मेतकूट जमले नव्हते. हरभऱ्याची वाळवलेली भाजी असावी तसा हा पाला होता. चवीला मात्र उग्र आणि घाणेरडा.

स्वाद न घेता, गपागपा मी तो कप एका दमात संपवला. पाणी प्यालो. शैला समाधानाने माझ्याकडे पहात होती. तिच्या नजरेला नजर न देता हुकूम सोडला,

'ताबडतोब चहा कर.'

चहा स्टोव्हवर ठेवलेलाच होता. तो लगेच समोर आला. आता बायकोवर खेकसायला गुंजाईश नव्हती. तोंडाने गिळलेले जरी पोटात पोहोचले असले तरी राहून राहून ओंगळवाणे वाटत होतेच. आठवणीने अंगावर शहारे येत होते.

चहा संपवून मी व्हरांड्यात आलो. समोर रस्त्यावर दादा आणि आई रिक्षातून उतरले. त्यांच्या हातातली बॅग घेऊन त्यांना घरात आणले. बहुधा कुत्रावृत्त त्यांच्यापर्यंत पोहोचले असावे.

का कुणास ठाऊक, आईला पाहिले की मला रडूच आले. लगेच सावरत, ते पडशाचे पाणी असावे असा भास निर्माण करत म्हणालो,

'जोरदार सर्दी झालीय.'

हातपाय धुवून आल्यावर लगेच आईने विचारले.

'कुठं चावलं माय कुत्रं? असं कसं चावलं? बघू?

मी पाय दाखवला. आता दोन्ही चाव्यांच्या जागेवर खपली पक्की बसलेली होती. सूज किंवा कळ अजिबात राहयला नव्हती.

आईने जवळ येऊन बसलेल्या शैलाला फर्मावले,

'सुनबाई, याला वर्षभर खीर किंवा शेवया खायला देऊ नकोस बरं का?

दादांनी पिशवीतून ॲल्युमिनियमचा एक डबा बाहेर काढला. मी, शैला, सोनू, गुंडू सर्वांसाठी चौदा दिवस घ्यायचे खुराकाचे उडीदाचे लाडू त्यात होते. दुसरा पुडा मुलांच्या खाऊचा. पेन्शनर आहेत वडील त्यांचे उत्पन्न तरी कितीक, पण त्यातून चांगले तूप वगैरेचा हा मोठा खर्च त्यांनी केला. किती माया करतात सर्वांवर.

सामान्यपणे पाच तारखेपर्यंत वडिलांची पेन्शन मिळते. यावेळी परभणीला त्यासाठी त्यांना जावे लागते. यावेळी शेतीच्या कामामुळे थोडा उशीर झाला. मला कुत्रा चावल्याचे कळाल्याने आधी इथं आले. इथून परभणीस जातील.

सकाळी साडेनवाच्या सुमारास गुलाबही रिक्षा घेऊन हजर झाला. आजपासून इंजेक्शने सुरू करायची. वारे आमची संक्रात! सरळ

पोटावरच आली चौदा इंजेक्शने द्यायला-

दादा-आई लगेच निघाले. रहाण्याचा खूप आग्रह केला. पण शेतीची कामं सगळी शिल्लक आहेत म्हणाले. दोघांच्या पाया पडून मी रिक्शात बसलो.

डॉ. जोशी दवाखान्यात आलेले होते. मला पहाताच त्यांनी कंपाउंडरला काही सांगितले. तो समोरच्या परमिट रूम असलेल्या हॉटेलमध्ये गेला. तिथल्या फ्रिजमध्ये इंजेक्शने ठेवली होती. त्यातले एक घेऊन कंपाउंडर आला. तोंडात पान असलेल्या डॉक्टरांनी खुणेने मला पडायला सांगितले. मी टेबलावर उताणा. इंजेक्शन म्हटले की माझा चेहरा लहान मुलासारखाच व्याकुळ होतो.

डॉक्टरांनी बेंबीजवळ सुई खुपसली. खूप, खूपच वेळ ते औषध रेटीत होते. इतका वेळ चालणारे इंजेक्शन मला नवीनच होते ते देऊन झाल्यावर थोडा वेळ तसाच पडून राहिलो. उठून बसेपर्यंत कंपाउंडरने राहिलेले इंजेक्शन हॉटेलच्या फ्रीजपर्यंत पोहोचविले असावे. उठून डॉक्टरजवळ आलो.

'डॉक्टर, बाकीच्या इंजेक्शनप्रमाणे दंडात किंवा कमरेत न देता हे इंजेक्शन पोटात का बरं देतात ?'

पिचकारी मारून डॉक्टरांनी तोंड मोकळे केले नी म्हणाले, 'बाकीच्या इंजेक्शनची क्वांटिटी अर्धा ते एक एम एम पेक्षा जास्त नसते. हे पाच एमएमचे इंजेक्शन आहे, अतिशय मोठ्या क्वांटिटीचे. ते अॅबसॉर्ब व्हायला एरिया मिळाला पाहिजे म्हणून पोटात.'

डॉक्टर जोशी नाटकात रंगलेला माणूस आहे. बिनधास्त चेहरा, आरामात पान चघळीत बोलतात. मला फार आवडतो हा माणूस.

इंजेक्शन चांगलेच दुखत होते. उभा राहिलो. पैशाचे पाकीट काढले आणि डॉक्टरकडे पाहिले.

'पाच रुपये.' डॉक्टर.

त्यांना पैसे देऊन बाहेर पडलो. रिक्शातून घरी. आल्या आल्या कॉटवर.

'आ ऽ हा ऽ हा ऽ हा'

‘काय झालं एवढं विव्हळायला ?’ बायको.

“शैले, जनावराला द्यावं एवढं लांबलचक दिलं ग इंजेक्शन ! मला आधीच तर इंजेक्शनचा कंटाळा. परभणीला मराठवाडा हायस्कूल-मध्ये शिकत असताना, पावसाळ्यात कॉलऱ्याची लस टोचायला डॉक्टर आले की ती चुकवण्यासाठी खिडकीतून पळून जाणारा आणि त्याबद्दल आठवी, नववी, दहावी, तिन्ही वर्षं दुसरे दिवशी एन. डी. एस. मास्तरचा मार खाणारा एकमेव बहाद्दर मी होतो !

‘अहो, बाळंतपणात मला एका दिवशी पंधरा इंजेक्शन दिली. काय वेदना असतील ! अन एका इंजेक्शननेच उहू, अहा, अहा, उहू–

‘आई–दादा गेले का ?’

‘हो. गेले. सोनू–गुंडू म्हणत होते आम्हाला गावाकडे यायचं म्हणून. खूपच तमाशा केला कार्ट्यांनी शेवटी मामंजींनी एकेक रुपया दिला तेव्हा गेले कसेबसे शाळेत. बरं, चला. जेवून घ्या. वेळ झाली नं तुमची कॉलेजची ?’

खूप वाटत होते बायकोने म्हणावे, राहू द्या आज कॉलेजला जाणे. पण ही तर पाठवायची घाई करते आहे. चला !

कॉलेजमध्ये आज फारसे तास झाले नाहीत. संक्रातीमुळं विद्यार्थी गावाकडे पळाले होते. प्राचार्य आज नसावेत. स्टाफरूममध्ये थट्टा मस्करीला ऊत आला होता. डॅडीभोवती सगळे जमा झाले होते. कोणाच्याही प्रश्नाला वावगा न समजता डॅडी सगळ्यांच्या ज्ञानात मौलिक भर घालत होते.

उदाहरणार्थ, ‘डॅडी, चीनमध्ये म्हणे ब्रेनवॉशिंगची मशीन काढलीय ?’

‘बरं डॅडी, जपानमध्ये जमिनी कमी असल्यामुळे हवेत घरं बांध-तात हे खरं का ?’ हवेत फ्लॅट्स काढलेत म्हणे !’

‘ते जाऊ द्या हो. डॅडी, ब्ल्यू फिल्म म्हणजे ब्लॅक अॅन्ड व्हाईट. किंवा इस्टमन कलर फिल्म असते तशी निळ्या रंगातली फिल्म का ?’

‘अरे डॅडी, तुला स्वतःच्या विषयातलं तरी कळतं का रे ? सांग

बरं मग शिवाजी महाराजांच्या काळच्या घोडीचा रंग कोणता ?'

डॅडी एवढ्या भडीमाराला न डगमगता सर्वांचे शंकासमाधान करीत होते.

'हे, पहा, शिवाजी महाराजांच्या काळच्या घोडीचा रंग कोणता होता हा मुद्दा गौण आहे. तर महाराजांच्या मोठेपणाच्या निमित्ताच्या मूल्यमापनाचे–'

– सगळे हॅं हॅं हॅं करून हसत होते. या मैफलीत घुसून रोज मी धूम माजवायचो. फारच मनोरंजक प्रकार असतो हा. फिस्टच म्हणा नं एक प्रकारची. डॅडींचे बोलण बेफाम आवडते आम्हाला. ठरवून सुद्धा एवढे अॅबसर्ड कुणाला बोलता येणार नाही. श्रीकांतने तर त्यांचे नाव 'अॅब्सर्डीटी का बेताज बादशहा' असे ठेवले आहे. पण आज मला रसच वाटत नव्हता.

स्टाफचा चहा झाला की मी लगेच उद्याचा रजेचा अर्ज देऊन कॉलेजबाहेर पडलो.

डोके ठणाणत होते. श्वास घेताना त्रास होत होता. नाकातून आणि डोळ्यांतून सारखे पाणी वहात होते. सायकल चालवताना मला ते वारंवार पुसणे देखील कठीण जात होते. प्रा. राठींना आजचे आज मला एल. आय. सी. काढायची आहे असा निरोप दिला होता. ते चार वाजता येणार होते.

समजा आपण मेलो तर निदान कर्जाने वेढलेला बंगला सोडून काहीतरी मागे रहावे. राठींना म्हणालो आज पैसे भरले तर पक्की पॉलिसी येईपर्यंत तो विमा ग्राह्य धरला जात नाही का ? ते म्हणाले तुम्हाला आज आम्ही पावती दिली की आजपासून तुमच्या जीवनाची जबाबदारी आमची झाली. मला फारच छान वाटले. आजच्या आज यण्यास मी त्यांना सांगितले. म्हणज आजपासून मरण्यास मी मोकळा !

घरी पोहोचलो तेव्हा शैला झोपली होती. तिला उठवावे वाटले नाही.

आपण पंधरा–वीस हजारांचा विमा उतरवतोय. काय होणार

आहे तेवढ्याने ? किमान कर्ज तरी फिटेल ना ? पुढे काय ? बायको एम. ए. बी. एड आहे. ज्या पोस्टवर आज मी काम करतो त्यासाठी आवश्यक ती पात्रता तिच्याजवळ आहे. माझ्याच जागी कॉलेजमध्ये तिला नौकरी लागू शकते. मग मी जाता राहील. कार्य काय? एखाद्या पळभर हाय हाय एवढेच.

भयानक पण सत्य आहे हे आपल्या मरण्याने काही एक बिघडणार नाही. हा अहंकार मूर्खपणाचा आहे की मी या घराचा पालनकर्ता आहे. माझ्यानंतरही हे घर चालणारच आहे. पण मला याचा आनंद वाटायला पाहिजे. निवांतपणे मरणाला सामोरे जाता आले पाहिजे.

तरी प्रश्न शिल्लक रहातोच. आपले जगणे कुणासाठी ? कशासाठी होते ?

कुणासाठी, कशासाठी, कुठे आणि कुठवर इमानाने रेटायचा गाडा असा जन्मभर ?

माणसाला बुद्धी मिळाली आणि प्रश्नाला पतंग समजून तो त्याची दोरी खेचायला लागला. किती तरी प्राणी उगाचच जन्मतात आणि निष्कारण मरतात त्याला कसला आलाय मातीचा अर्थ आणि त्याचे कसले आलेय तत्वज्ञान ?

मरणाची भीती तरी वाटते का ?

मग भगवानच्या मृत्यूनंतर तरी आपण असं का वागलो ?

औरंगाबादला (९ जानेवारी ८२) ड्यूटी संपवून मोपेडवरून यत असताना ए. पी. आय. च्या वळणावर पोलीस बॅण्ड असलेल्या गाडीने भगवानला उडवले.

फोनने इथे व परभणीला कळवण्यात आले. निरोप मोघम. काळजाचे पाणी पाणी करणारा. संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास फोन आला आणि वन डाऊनने आम्ही औरंगाबादला रवाना झालो. गुंडू तेव्हा अवघ्या सहा महिन्यांचा. सगळेच निघालो. परभणीला वडील आसन्नमरण होते. आई तिथेच होती. तिथेही फोन गेला. आकांत

करीतच आई निघाली. आम्ही पोहोचलो तेव्हा वैद्यकीय महाविद्यालयाच्या इस्पितळात पंचवीस वर्षांचे ते आयुष्य शांत झाले होते. चेहरा पहावासा वाटू नये इतका भेसूर झालेला.

भगवानची कुठलीही चूक नसताना हे घडले. त्याला धडक देणारी व्हॅन थांबली देखील नाही. हे दृश्य पहाणाऱ्यांना एवढा संताप आला की त्यांनी तिच्यामागून येणारी व्हॅन थांबवून जाळली. भगवानच्या पाठीमागे बसलेला देशपांडे नावाचा मुलगा लांब उडून पडला. तोही बेशुद्ध...

एलोराने आई आली आणि बांध फुटला. त्या ड्रायव्हरला शिव्या दिल्या. खून करीन म्हटले.

शेवटी टॅक्सी करून माझ्या निजलेल्या राजहंसाला घेऊन परभणीला निघालो.

पौर्णिमेची रात्र होती ती. ग्रहण लागून गेलेले होते. रात्रभर तो चंद्र डोळ्यांपुढे होता. त्यानंतर दोनतीन वर्षे मी कोजागिरीचा सुद्धा पूर्णचंद्र पाहू शकलो नव्हतो.

भगवानचे क्रियाकर्म माझ्या हाताने झाले. केवढे दुर्दैव. किती कोडकौतुक, किती लाड केले या हातांनी भगवानचे, ह्याच हातांनी.

मी रडायला लागलो हे शैला किती वेळचे पहात होती कुणास ठाऊक. काही बोलून त्रास मात्र दिला नाही. चहा करू का म्हणाली, मी नको म्हटले आणि पेग भरला.

भगवानच्या सुतकात घरातल्या आणि सर्वच माणसाकडे पहाण्याची दृष्टीच बदलली. सोने म्हणून जवळ करतो ते रक्ताचे ऋणानुबंध पितळी ठरतात. शोक व्यक्त करण्याचे ढंगही इतके नाटकी असू शकतात. भगवानला अग्नी देऊन आलो की माझे आजोबा म्हणाले.

लागा स्वयपाकाला. त्याच्या तोंडात माती पडली पण आपल्या पोटात आग पडली.

ओऽह ! इतकी निर्मम भाषा. कसले शब्द त्या लेकरासाठी. आई ग... कसल्या माणसात येऊन पडलोय मी.

वडील एवढे आसन्नमरण आजारी. पण त्याच्या खिशातले पैसे

आणि घड्याळाची चौकशी करत होते. संजय गांधी मेल्यावर इंदिरा गांधी स्वीस बँकेचा नंबर शोधत होत्या म्हणे...

दहा दिवस सोकॉल्ड चुलते चुलत्या पुख्खे झोडत होते. आणि त्याच्या तैनातीत काही कमी पडू नये म्हणून आई माझ्या पत्नीला झापत होती. जणू दु:ख तिलाच फक्त नव्हते. आणि पाहुणचाराने त्याच्या आत्म्याला शांती मिळणार होती.

परम मित्र रवीन्द्र सुर्वे धावून आले. चार दिवस रेस्ट हाऊसवर रात्री आम्ही प्यायचो आणि दिवसभर हे बेगड सहन करायचो. रवीन्द्र सुर्वेंनी भगवानवर कविता लिहिली. एक अटल मेघ. त्यांच्या मासिक श्राद्धाला आम्ही सर्व भेटीस आलेल्यांना पाठवली.

हा एक अटळ मेघ माझ्या अंगण कुंपणावरून सावलीच्या रूपाने संथपणे सरकत असतो नेहमीच. कधी तरी जेव्हा तो शेजारच्याच झोपडीवर उतरतो तेव्हा मी त्याला जवळून पाहतो आणि शहारतो.

उत्तर रात्री झोपी गेलेल्या माझ्या वस्तीच्या खिडक्यांपर्यंत दूर-वरच्या पुलावरून धडधडत जाणाऱ्या आगगाडीचे आवाज यावेत तसा त्याच्या पावलांचा अनाहत नाद मला श्वासाश्वासागणिक ऐकू येतच असतो. आणि एखाद्या संध्याकाळी हमरस्त्यावरच्या एका अकल्पित वळणावरतो त्या अटळमेघाचा रथ माझ्यावरून धडधडत पुढे जातो.

नंतर दुसऱ्या अंगणकुंपणावरून आपल्या सावलीने शिवण्याचा खेळ करीत असतो.

हा एक अटळ मेघ...

जगण्याची पूर्ण इच्छा नष्ट करणारे ते दहा दिवस होते. कुणा-साठी जगायचं. माझ्या काळजाचा घड तर निघून गेला. आता मीही जाणार त्याच्या पाठोपाठ, तेरा दिवस तो आत्मा पृथ्वीवर घोटाळतो ना. साथ साथ ही जायेंगे !

दहाव्या दिवशी गंगेला कर्मांतराला जायचे. मी मावशीचे गाव कानसूर निवडले.

संभोगाचे खरकटे अंग असले की त्याला भूत घोळसते हे मी

ऐकून होतो. कानसूरला जाण्याच्या आदल्या रात्री कुठलीही वासना नसताना केवळ अंग खरकटे करण्यासाठी मी बायकोला प्रवृत्त केले. दुसरे दिवशी स्नान न करता निघालो.

एका फडक्यात अस्थी बांधून घेतल्या होत्या. आता मला असा विटाळ होता की ओसरीवर सुद्धा जायचे नाही. कानसूरला आम्ही पोहोचलो तेव्हा मध्यरात्र झाली होती. काळाकुट्ट अंधार. तर इतका भीषण मला कधी जाणवला नव्हता. भुतांनी घोळसण्याची मी मोठ्या आतुरतेने वाट पहात होतो.

मला अस्थींची ती पुरचुंडी झाडाला बांधून टाकण्यास सांगितले. झाडाच्या एका फांदीला मी ती बांधली आणि मावस भावाच्या घरी आलो. आंघोळ केली आणि झोपलो.

तीन दिवस चाललेल्या दशक्रिया विधीतले दोनच प्रसंग आठवतात. सगळ्या पितरांचे भाताचे पिंड केले होते आणि एक पिंड भगवानचा ब्राह्मणाने दाखवून दिले हा भगवानचा पिंड आहे. मीं बाकी सगळ्यांना थोडे थोडे तूप घालत होतो आणि भगवानला खूप तूप घालत होतो. रडत होतो.

भगवान, कवटी फुटण्याएवढा दाह म्हणजे किती असेल रे, घे आणखी तूप घे–

रोज सराईतपणे हा धंदा करणारा ब्राह्मण तेव्हा रडला हेही आठवते–

दुसरा प्रसंग पिंडाला कावळा शिवण्याचा. कितीही संकल्प करण्याची, पूर्ण आयुष्य भगवानच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी वाहून घ्यायची माझी तयारी होती. त्याच्या काय इच्छा असू शकतील याचा विचार मी सुरू करतो न करतो तोच कावळ्याने झडप घातली मी बाजूला होण्याच्या आत मला वैफल्य आले.

जगण्यासारखं काही नाहीच. माणसे ही स्वार्थी पशू आहेत. म्हणून मरायला काही हरकत नाही अशा विचित्र विचारात मी तेव्हा होतो. भगवानच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी पुन्हा मला मरणाचे विचार भेटताहेत. पण आता मरणाबद्दल माझे चांगले पूर्वग्रह आहेत.

सदय शांत असशी तू मरणा
भीती तुझी वाटेना रे

प्रा. राठी आले. वीस हजारांचा विमा काढला. पावती घेतली. ती शैलाच्या फाइलीत जपून ठेवली.

राठी म्हणाले, ' तुम्हाला कुत्रं चावलं म्हणे. '

' हो. ' हसण्याचा प्रयत्न करीत मी.

' कुंडलवाडीचं औषध घेतलं का ?'

' आजच सुरू केलंय. '

' अहो सर, यांना जरा समजावून सांगा. सतत नको नको ते वाईट विचार करताहेत. ' शैला म्हणाली.

' हे पहा मला पिसाळलेलं कुत्रं चावलं होतं. मी कुंडलवाडीला औषध घेतलं होतं. बारा वर्षे झाली. फारच खात्रीचं औषध आहे ते. ते घेतल्यावर पुन्हा काही घ्यायची गरज नाही. ' राठी सत्यच सांगत होते. बरं वाटलं ऐकून, चहा वगैरे घेऊन ते गेले.

मी बहुधा संध्याकाळी सहाच्या सुमारासच झोपलो.

म. सं. सं. का., वाचनालय शाखा.
बाल
क्र. 2889 9/8/92
विषय कथा

# बुधवार / १५ जानेवारी

कुंडलवाडीचे औषध आणि अँण्टीरेबीज व्हॅक्सीनचा आजचा दुसरा दिवस दुसरा डोस. कालच्या मानाने आज औषध खाताना कमी ओंगळवाणे वाटले कारण प्रा. राठींचे कालचे आश्वासन. इंजेक्शनची जागा बदलली. मन रमवले कसेतरी.

घरी आलो तेव्हा मधू आलेला होता. पाहता क्षणी त्याने सांगितले पुस्तक आणले आहे. आज त्याला मंठ्याला का चारठाणला जायचे होते, परवा बसू म्हणाला,

शैला म्हणाली, 'मधु, तू पहिली जी केस सांगितली तीच त्यांच्या डोक्यात आहे. चौदा इंजेक्शने घेतली, कुत्रा जिवंत तरी बाई हायड्रोफोबियाने मेली.

मधु गंभीर झाला.

मी तुम्हाला ती केस सांगायलाच नको होते. तरी मी म्हणालो होतो की कुत्रा आयडेंटिफाय करण्यात घोटाळा झाला किंवा व्हॅक्सीन फ्रीजमध्ये ठेवले नाही म्हणून. बरं आपला कुत्रा कसा आहे ?

गेलोच नाही तिकडे. त्याला पहायला जायची हिंमतच होईना.

कमालच आहे सर ! त्या कुत्र्याला खरं तर ताब्यात घेऊन बांधूनच टाकायला पाहिजे.

बरं इंजेक्शनं सुरू केलीत ना ?

हो.

तुम्हाला काही नाही हो झाले. आता तुम्ही म्हणाल तुम्हाला बरे वाटावे म्हणून मी हे सांगतोय पण मामींना विचारा माझ्या सख्या आत्याला पिसाळलेल्या कुत्र्याने आठ-दहा ठिकाणी फोडले होते.त्याच दिवशी ते कुत्रे मेले. आत्याने काहीही केले नाही तरी तिला काही झाले नाही. मेडिकल सायन्सला चॅलेंज आहे की नाही अशी केस. आपल्या शरीरात स्वतःची प्रतिकारशक्ती असतेच. ती औषधाखेरीज बंदोबस्त करते.

मधूचे बोलणे मला आवडू लागले. पण त्याला जायची घाई होती. आपले नशीब बासरीवाल्यासारखे आहे. आपल्या वाट्याला हटकून योगच येणार. बघू या काय होते ते. आज सातवा दिवस आहे. दोन तीन दिवसात बात खत्म. कदाचित बात म्हणजे खुद्द मीच !

कुत्र्याच्या खुशालीची खबरबात ठेवणे आवश्यक आहे तर खरे. परवाच्या रात्री सिनेमातला पाऊस पाहून बेचैन झालो त्यानंतर पाण्याकडे देखील पहाणे नाही. आंघोळ करताना बादलीकडे पहात नाहीत. पाणी पिताना डोळे मिटून पीत आहोत. पाणी डोळे मिटून प्याल्याने आतला प्रवास थोडाच थांबणार आहे.

आतला प्रवास. काय चालले असेल आत ? सापाचे विष भिनत जाऊन हृदयापर्यंत पोहचते तेव्हा झेंडू फुटतो म्हणतात.वश्याला लहानपणी एन्ड्रीन घालून खून झालेला पाहिला होता. फार वेळ लागतो त्याने मरायला. आत एकेक नस फुटत जाते. ती शांताबाई दोन-तीन तास नुसती हातपाय आदळत होती, संबंध ओसरी उकरली होती. तिला बोलता आले असते तर तिने सांगितले असते जणू एखादा धोंडा घाला अन संपवा हे. जगणे इतके वेदनामय असू शकते का की त्यापेक्षा मरण परवडले ?

शायद नावाच्या सिनेमात इच्छामरणाची कायदेशीर परवानगी हा थीम होता. मर्सी किलिंग.

पुष्कळदा आत्महत्या करणारेसुद्धा मरणकळा सोसू शकत नाहीत.

फो...४

वश्याला लहानपणी पाहिलेला प्रसंग. तुळशी नावाच्या माळ्याच्या बाईने दस्तक्यांच्या आडात जाऊन जीव दिला, एखांददुसरी तरी डुबी मारली की नाही कुणास ठाऊक पण आडाच्या एका कणगीला घट्ट धरून ठेवले. आणि आरडाओरड सुरू केला.

लोक जमा झाले.तिला कसे वर काढायचे याचा विचार सुरू झाला. सोल आणायला कुणाला तरी पाठवले पण त्या बाईने आतून खेकसायला आरंभ केला. लवकर काढा म्हणून. एक जण खास हेल काढून म्हणाला.

'ईयाऽ तुला कोणी मार म्हटलं का उडी.'

जगण्याची तीव्र इच्छा असणे हा जीवाचा धर्मच. जीजीविषा. एक दिवस सगळ्यांनाच मरायचे हे खरे असले तरी जगण्याची ईर्ष्या हेही वास्तवच आहे. त्यात स्वाभाविक, विकृत काही नाही. मला पण जगायचंय. अत्यंत आवडीने जगायचंय. या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करत जगायचंय. माझ जगणे माझ्या बायको पोरासाठी आवश्यक आहे.म्हणून नव्हे तर उत्कट विजिगीषेने जगायचंय.जगण्याला कशाला हवे समर्थन ? बस्स. मैं जीना चाहता हूँ. डोक्यातला हायड्रोफोबिया गेला की बस. आनंदयात्रा.

एवढा मित्रांच्या कोंडाळ्यात रहाणारा, खिदळणारा माणूस मी. किती एकाकी झालोय. मित्रांना टाळतोय. ते येऊ नयेत हे पाहतोय. शैलाला टाळतोय. मुलांना पिटाळतो आहे. या अवस्थेची कानकोंडी वाटते आपल्याला. लोकांना हास्यास्पद वाटेल आपला विचार, मनस्थिती पण खरेच किती ज्युनाईन आहे आपला प्रॉब्लेम. काही नसेल तर ठीकच आहे, उद्या आपण स्वत: आपली टिंगल करू. पण काही असेल तर–खरेच काही असेल तर–

दुपारी सडकून झोप लागली. चांगली ५–६ तास हळदीकुंकवासाठी गावात गेलीय. किती वेळ लागेल सांगता येत नाही. बायकांना हेच निमित्त असते एकमेकीकडे जायला.

शैला विचारत होती आपल्याकडे हळदीकुंकू कधी करायचे. या

वर्षी मला कशाने लुटू ? मी उगाच ओरडलो–

मी इथं मरायल्लोय–

तिने पुन्हा विषय काढला नाही. आता काय केले हे न विचारणेच चांगले. कशाला पुन्हा खपली काढायची.

रात्री चित्रहार पहात असताना एक अप्रिय प्रसंग घडला. टीपॉय–टरच्या तांब्या-पेल्यातले शैला पाणी प्यायला लागली मी मोठ्याने ओरडलो–अग तो माझा पेला आहे.

! मी का कधी प्याले नाही तुमचे उष्टं–तिने रोमँटिक होत विचारले. त्या प्याल्यात कदाचित उष्ट पाणी देखील असेल आणि तिचा इरादा काही बदलेना. शेवटी मी उठून खमकन प्याला ओढून घेतला.

शैला चिडली. मी हे का करतो हे लक्षात आल्यामुळे जास्तच चिडली.

' जे काही तुमचं व्हायचंय ते आमचं होऊ द्या. तुमच्याशिवाय आम्हाला राहून तरी काय करायचंय. तुम्हाला मरायचं असेल तर आम्ही तुमच्याही पुढे होतो. असं काही बाही बोलत होती. मी शांतपणे ऐकून घेतले. आणि त्या पेल्यातले पाणी फेकून विसळून ठेवला.

जरा जपलेच पाहिजे, नाही का ? म्हणजे तसे काही नसेल तर प्रश्नच नाही पण असेल तर संसर्ग टाळायला नको का ? ही उगीचच डोक्यात राख घालते आहे. चुकीच्या मुद्यांवर सेंटीमेंटल होते. जाऊ द्या. त्यातून तिचे प्रेमच ओसंडत आहे ना ? हाऊ लव्हेबल आर यू.

यावेळी मृत्यूला मी तयार आहे, पग इथून पाय ओढत नाही. एकदा यांपूर्वी आपण मृत्यूच्या स्वागताची किती सुंदर तयारी केली होती. स्कायलॅब पडणार होती तेव्हा. सहकारवाडीत माडीवर रहात होतो स्कायलॅब पडणार याविषयी आपल्या मनात तिळमात्र शंका नव्हती. वेळसुद्धा वर्तमानपत्रात आली होती. रात्री आठ वाजून काही मिनिटांनी.

संध्याकाळी प्रिय मित्रांना भेटून घेतले होते, ठीक सात वाजता टेपरेकॉर्डर सुरू केला सर्वप्रथम रजनीशची कॅसेट ऐकली. त्यानंतर

ग्रेसच्या कविता वाचल्या. त्यानंतर अतिशय निवडक अशी परमप्रिय गाणी ऐकायला आरंभ केला. मृत्यूपूर्वी दोनही गाणी मात्र मी मास्टर मदनची ऐकणार होतो. त्यातही सुरवातीला ऐकले हैरतसे तक रहा है जहाने वफा मुझे, ' नंतर यूं न रह रह कर हमे तरसाइए '

शेवटच्या ओळी होत्या—

ये हवा, सागर ये हलकी चाँदनी

जी मे आता है यही मर जाइए।

चाँदनीला एकदा चुकून म्हटलेले ' यातनी' नंतर चाँदनी. नियोजित कार्यक्रमानुसार आता मरण येण्यास हरकत नव्हती. पण स्कायलॅब पडलेच नाही—

आताही वाटले एकदा रजनीशची कॅसेट, मग ग्रेसच्या कविता असे त्या क्रमाने करावे. पण काय गॅरन्टी ? शेवट चांगला व्हावा असे कुणालाही वाटते पण तो शेवटचा क्षण ठरवणारे आपण नसतो. कसा होणार आपला शेवट ? कसा होणार ?

बुलबुले नावाचे कोत्तापल्लेंचे एक रूममेट होते कुरुंदकरांचे भक्त. त्यांच्या मेंदूवर नंतर परिणाम झाला. पण आधीही वेगळयाच दुनियेत असायचे. एकदा सकाळी महाशयं खोलीत या टोकापासून त्या टोकाला फेऱ्या घालत होते. कोत्तापल्ले झोपेत. काय वाटले कुणास ठाऊक कोत्तापल्लेंना हलवून उठवून म्हणाले—

कोत्तापल्ले, माझ्या मेंदूत रक्तस्राव होऊन मरेन असेच मला वाटते.

कोत्तापल्लेने डोळे चोळीत सिगरेट पेटवली. काहीतरी इंटरटेन केलेच पाहिजे म्हणून विचारले—

का बरं ? कशावरून ?

' जगातल्या सगळ्या मोठ्या माणसांना असेच मरण आले आहे.'

कोत्तापल्लेने सहज विचारले, बरं बुलबुले, मला कसं मरण येईल?

' तुम्ही अंथरुणात कुजून मराल—'

बुलबुलेंना आपले मरण विचारले असते तर म्हणाले असते, तुम्ही ओरडून ओरडून खांबाला बांधून टाकलेल्या अवस्थेत झटके देत

मराल–

शैलाचे काय चालले होते कळत नाही. एरवी अष्टोप्रहर एकत्र बडबडत असतो. ती स्वयंपाकघरात असताना लसूण सोलणे शेंगदाणे सोलणे करायचो अलिकडे हे काही करत नाही. फारसे बोलत नाही, उलट टाळतो आहोत. शेवटी माणूस एकटा असतो. एकाकी असतो. लग्नानंतर तो फारच एकाकी बनतो. आपली बडबड ही या विवेचनातून असेल. विलक्षण कधी कधी असह्य, पण अपरिहार्य असते.एकाकीपणाची जाणीव ' चाँद तन्हा है आसमां तन्हा ' या मीनाकुमारीच्या गझलेपासून कभी तन्हाईयोंमें हमारी याद आयेगी पर्यन्त एकाकीपणाची जाणीव मनात हाव घेऊन बसली आहेत. आणि गुलाम अलीची ती गझल–

मैं तन्हा था मैं तन्हा हूँ
तुम आवो तो क्या ना आवो तो क्या–
एकाकीपणाची सगळी गाणी ग्रेट आहेत.

संध्याकाळी चमचमीत काहीतरी खावे वाटले चिकनचा बेत ठरला शेवटी. कुणाला तरी पैसे देऊन पाठवले. बाकी तयारीला लागलो.

तासभर झाला नसेल बाहेर मोत्याचे जोरजोरात भुंकणे ऐकू आले बाहेर डोकावून पहातो तर तो मुलगा डब्याची पिशवी उंच धरून उभा आणि मोत्या त्याच्याशी झटतो आहे.

अस्सा राग आला. काठी घेऊन धावलो आणि चांगला सडकून काढला मोत्याला. एवढं मारतोय तरी पोराजवळून हलायला तयार तयार नाही. मग अजून मारला. त्या पोराच्या हातातली पिशवी घेत दुसऱ्या हाताने काठी उगारली.

जवणे करून अंथरूणावर पडलो.हे अंथरूण म्हणजे आपली अघोरी चितनिकाच झालीय. काय असोशिएशन आहे कुणास ठाऊक !

मोत्याला मारले यात विचार करण्यासारखे काय आहे ? पण राहून राहून वाईट वाटत होते. आजच एवढे का मारले आपण मोत्याला ? आपण शक्यतो हॉटेलमध्ये नॉनव्हेज घेण्याऐवजी घरीच घेतो. मोत्याला चार हाडे चघळण्याला मिळावीत म्हणून. कुत्रा हा

वास्तविक मांसाहारी प्राणी आहे. त्याला तुमच्या भाकरी पोळ्यांनी काही होत नाही. खरे तर आठवड्यातून दोनदा तरी त्याला मटन दिले पाहिजे. मुद्दामहुन आणून दिले पाहिजे. पण इतके पर्टिक्यूलर रहाता येत नाही म्हणून आपण आपली सामीष जेवणे घरीच घेतो. त्याच्यासाठी.

मोत्याला हा कार्यक्रम त्याच्या वासासह आता परिचित झाला आहे. नेहमीच तो असा उतावळेपणा करतो. आज नवीन नाही हे. मग आजच त्याला का मारले ?

काही बरे लक्षण नाही हे. कुठेतरी आपल्या मनाच्या तळाला कुत्रा या प्राण्याविषयीच शत्रुत्वाची भावना निर्माण झालीय. आपण कितीही नाकारत असलो तरी हे सत्य आहे. आपले मनच रोगट झालंय मुळी. वर्ष दीड वर्ष ज्या मुक्या प्राण्याने तुम्हाला आणि तुम्ही त्याला एवढा जीव लावला त्याच्या जीवावर आज अकारण तुम्ही उठलात ?

अकारण कसे म्हणता येईल ? मला चावलेला कुत्रा देखील अकारणच चावला किनई. मी काय त्याच्या वाटेला गेलो का ! शेवटी पशू तो पशूच ! त्यांना कसली आलीय संस्कृती ?

घड्याळाकडे लक्ष गेले तर अकरा वाजून गेले होते. अरे बापरे ! अजून आपल्याला झोप येत नाही ? टकळी पडते की काय आज ?

टकळी पडण्याची आठवण कल्पवृक्षाखाली बसून केल्यासारखीच असते. वाटले की टळकी पडलीच.

मोत्याला मारले तसेच काही गोष्टींची विनाकारण घृणा करतो की काय असे वाटू लागले. उदाहरण – पाणी

पाणी किती प्रिय आपल्याला. अगदी लहानपणापासून पाण्याच्या आठवणी आहेत. त्यातल्या काही जीवघेण्या देखील –

वश्याला आमच्या घरात खापराची एक मोठी नांद होती, नांद म्हणजे वर मोठे गोल तोंड खाली निमूळते होत गेलेले. पाण्याची आमच्या घरातील खापराची साठवण. या नांदीचे वैशिष्टय़ म्हणजे प्रत्येक रांगते मूल तिच्यात पडलेले आहे. पंचमहाभूतातून नुकतेच

माणूस झालेल्या लहानाला पाण्याचे आकर्षण असणारच. मी रांगत रांगत पडलो. किती डुब्या मारल्या कुणास ठाऊक पण लक्ष गेले लवकरच कुणाचे तरी आणि वर काढले. घरातल्या सर्वात मोठ्या भावाचा मी सर्वात मोठा मुलगा. मी सुरू केलेली ही नांदीत पडण्याची परंपरा पुढे कित्येक तान्ह्याने पाळली.

दुसरा जीवघेणा प्रसंग गंगाखेडला. दोन–एक वर्षाचा असेन मी तेव्हा. सिंहस्थाच्या निमित्ताने सर्वजण गंगाखेडला गोदावरीवर गेलो. माझे वडील आणि माझे मामा यांनी मला एकमेकाकडे फेकण्याचा खेळ सुरू केला. नदीला पाणी तसे भरपूर. फेकता फेकता मध्येच मी पडलो आणि सापडेना, सगळे घाबरून गेले. पण मी एका काठाला लागलो. उलटे करून नाका-तोंडातून पाणी काढले. विशेष काही झाले नाही.

भरपूर पाण्याच्या आठवणी कानसूर या मावशीच्या गावातील गोदावरीच्या आणि वश्याच्या स्वतःच्या शेतातील विहिरींच्या आहेत. या पाण्यात मी मनसोक्त डुंबलो आहे.

आज पाण्याच्या नजरेला नजर देण्याचे टाळतो आहे.

आज अंतरात भीति
खुल्या चांदण्याची थोडी
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी

म. ग्रं. सं. ठाणें, ग्रामसंस्था शाखा.
क्रा. २०४९ १८।७।८२
विषय का वा

## गुरुवार / १६ जानेवारी

आपण डॉक्टरवर किती विश्वास टाकतो. अलीकडचे डॉक्टर त्या विश्वासाला पात्र राहिल्येत का ? हॉस्पिटलमधील बेपर्वाई, औषधातील भेसळ, मुदत सपून गेलेली औषधे व इंजेक्शन देणे यामुळे होणाऱ्या मृत्यूच्या सतत बातम्या येत असतात. बाकीच्या बाबतीत सतर्क आणि चिकित्सक असणारे आपण डॉक्टरांच्या बाबतीत किती निर्धास्त असतो.

सध्या घेत असलेले व्हॅक्सीन फ्रीजमध्ये ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबाबतीत थोडी जरी हयगय झाली तरी त्याची उपयुक्तता नष्ट होते. आज जरा बघायला पाहिजे.

कुंडलवाडीच्या औषधाचा आज शेवटचा दिवस, भारलेल्या खारका आजच संपल्या. पण प्रकृती अधिकच बिघडते आहे. अंगात ताप असल्यासारखा वाटतोय. अशक्तपणा आलाय, श्वास घेताना त्रास होतो आहे. घसा सगळा लाल झालाय. तो व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स कमीमुळे का ही सगळी हायड्रोफोबियाची लक्षणे ?

सकाळी डॉक्टरकडे जाण्यापूर्वी समोरच्या हॉटेलमध्ये गेलो. तिथे काऊंटरवर सहज विषय काढल्यासारखे विचारले.

समोरचे डॉक्टर तुमच्याकडे इंजेक्शन ठेवतात का ?

सगळे नाहीत ठेवत. फक्त कुत्रा चावल्यानतर द्यायची ठेवतात. म्हणजे तो कंपाऊडर पेशंट आला की येतो आणि इंजेक्शन दिले

की नेऊन ठेवतो का ?

कशामुळे एवढी चौकशी करता आहात ? अहो तुमचीच इंजेक्शने चालतील ना आता ? एवढ्या बाबतीत ते फार पर्टिक्यूलर आहेत. आणि एक गोष्ट सांगतो माणसाने डॉक्टरवर श्रद्धा ठेवावी.

चडफडत मी तिथून निघालो. फारच राग आला त्या माणसाचा. त्याने आपल्याला एवढे परखडपणे ऐकवण्याची काय गरज होती ? आता त्याने हे डॉक्टरला सांगितले तर.

चटकन दवाखान्यात शिरलो. कंपाऊंडर माझे इंजेक्शन आणण्यासाठी समोर गेला. आला देखील लगेच. पण प्रचंड टेन्शन आले हॉटेल मालकाने याला काही सांगितले की काय ? आणि तो डॉक्टरला काही बोलतो का ? डोळ्यात आणि कानात प्राण आणून मी अवधान केंद्रित करत होतो. तो डॉक्टरला बोलला नाही. आपल्या समोर बोलेल कसा ? आपली पाठ फिरली की कान भरेल.

आज इंजेक्शन घेताना प्रचंड वेदना झाल्या. असा किळसवाणा प्रकार आणखी अकरा वेळा ! छे ! त्यापेक्षा मरण परवडले. काही तरी करून ही इंजेक्शनची बला टाळली पाहिजे.

इंजेक्शन घेऊन घरी आलो तर शेजारी आणि लेखक मित्र पेकम सचिंत बसलेला.

'यार एक अगाऊच ताप झालाय ! आमच्या राजूला कुत्र्याचे पिल्लू चावलं ! ते कुत्रं पण मेलं.

मी मटकन बसलो. बापरे ही कुत्र्याची जात माणसाच्या जातीला नष्ट करायला बसलीय.

कुठून आणलं होतं ते पिल्लू ? त्याला अँटीरेबीज इंजेक्शन दिले होते का ?

तू तर पोपटासारखा बोललास ? एवढा मोठा तुझा मोत्या. त्याला अजून तरी दिले का आँटीरेबीज ?

मी नाहक शरमलो. आता वर मान करणारी काहीतरी कृती केली पाहिजे. मित्रासाठी काहीतरी तळमळ दाखवली पाहिजे. तो त्या अपेक्षेने आलाय. आपली इंजेक्शने देऊन टाकतो तर ! गुड आय-

डीया. म्हणजे आपली सकाळची हेरगिरी त्या डॉक्टरला कळाली असली तरी त्याच्या समोर जाऊन शरमिंदे होणे नको की तो यातनामय खंजीर पोटात खुपसून घेणे नको.

हे पहा पेकम, त्याला त्वरेने आजच्या आज इंजेक्शन सुरू करा.

अरे पण, कसं शक्य आहे ते ? तो इंजेक्शन्स परभणीला मिळतात. तुझा सासरा जिल्हा परिषदेत अधिकारी असल्याने तुझे काम झटपट झाले. आम्हाला कोण थारा लागू देणार आहे ?

मग असं कर. माझे ११ इंजक्शन्स अजून शिल्लक आहेत. तोपर्यंत ती सुरू करू या. मी तुला ती देऊ केलीत म्हणून सांग डॉक्टरना. दरम्यान दोन–तीन दिवसात तू तुझी मिळव.

'पण... बरं ठीक आहे. आत्ता नेतो त्याला डॉक्टरकडे पेकम गेला.

पहा, माणसे कशी स्वार्थी असतात. स्वतःचं काम झाले की दुसऱ्याचे काहीही होवो. गरज भागविण्यासाठी वैद्याचा खूनसुद्धा करतील. विचारले का त्याने आपल्याला की तुझा इंजेक्शनचा कोर्स आहे. तुझे कसे म्हणून ?

पण बरे झाले. माझी पीडा टळली. दुहेरी पीडा. आज उपचारपर्व आणि औषधयात्रा समाप्त. हिंदीत अशा आशयाचा एक दोहा आहे. असे म्हणतात सुंठ उगाळून लावल्याने डोकेदुखी कमी होते पण सुंठ उगाळणे हीच काय कमी डोकेदुखी आहे ?

नाहीतरी आपले मरण अटळ आहेच, निदान सुखाने तरी मरू.

तुका म्हणे मुक्ती, परिणली नोवरी
दिवस आता चारी ! खेळीमेळी.

इंजेक्शन देऊन टाकल्याचा शब्द गेला खरा, पण काहीतरी भयानक चूक केल्यासारखे वाटू लागले. आपण मित्रासाठी तत्परता दाखवणे, डॉक्टरसमोरची कानकोंडी टाळणे आणि त्या इंजेक्शनची यातनामयता टाळणे ह्या सर्व गोष्टी एकाच कृतीने साधल्या. आपण खरोखरीच किती बुद्धिमान आहोत. त्या जोकमधल्या सरदारजीपेक्षा

किंवा निदान त्याच्या तोडीचे तरी बुद्धिमान आहोत.

एका देशात फाशीची शिक्षा देण्याची विशिष्ट पद्धत होती. गुन्हेगाराला एका मशीनखाली झोपवत असत. कळ दाबली की सपकन वरून एक मोठे पाते त्याच्या मानेवर आदळे आणि शीर धडावेगळे होत असे.

एकाच आरोपावरून तिघांनाही शिक्षा झाली ज्यात एक सरदारजी होता. वधस्तंभाकडे तिघांना नेण्यात आले. पहिल्या कैद्याला मशीनखाली झोपवण्यापूर्वी जल्लाद म्हणाला–

'तुझ्या देवाला करुणा भाक. तू जर खरंच हा गुन्हा केला नसेल तर तो काहीतरी चमत्कार करेल.'

त्या बिचाऱ्याने आपल्या धर्माप्रमाणे प्रार्थना केली. जल्लादने मशीनची कळ दाबली. योगायोग असा की खडखडत ते पाते येऊन मानेच्या थोडे वरच थांबले.

जल्लाद चकीत झाला. परमेश्वरकृपा किंवा हा खरेच निर्दोष असला पाहिजे असे समजून त्याने त्याला सोडून दिले.

दुसऱ्याला त्याने प्रार्थना करायला सांगितले. तशी दुसऱ्या कैद्याने केली. मशीनची कळ दाबली गेली. पुन्हा खडखडत पाते खाली आले व थांबले. पुन्हा चकीत होऊन त्या दुसऱ्याचीही त्याने सुटका केली.

तिसऱ्या क्रमांकावर आले सरदारजी. हा सगळा प्रकार चौकस व तीक्ष्ण बुद्धीने न्याहाळत होते जल्लाद म्हणाला, 'सरदारजी, ते दोघे सुटले. बहुतेक तुम्हीच दोषी असाल. तरीपण प्रार्थना करून पहा. न जाणो परमेश्वराने अशीच कृपा तुमच्यावरही केली तर–'

सरदारजींच्या नजरेत बौद्धिक चमक होती. एकदा त्या मशीनकडे आणि जल्लादकडे पाहून तो जल्लादला म्हणाला, 'अरे गाढवा, मला अक्कल शिकवतोस काय? पण त्याच्या आधी तुझी बिघडलेली मशीन दुरुस्त कर.'

आज भर बारा वाजता आपणही सरदारजीसारखेच वागलो.

घरात डोकावून पाहिले तर आनंदोत्सव चालला होता. कुणीतरी मैत्रीण बसलेली. तिच्याकरिता खास पदार्थ तयार होत होता. इथे

मी मरायलोय आणि यांचे सोहळे चाललेत. चालू द्या साल्यांनो ! माझा फक्त दोन दिवस वैताग आहे तुम्हाला. फिर मैं चला--

कहर असा की माझ्या औषधपाण्याची व प्रकृतीची चौकशी करणे राहिले बाजूला मलाच शैला विचारते.

'आज कॉलेजला जायचं नाही का ?'

'आता साडेबारा वाजता कॉलेज ?' मी संताप दाबून म्हणालो,

'तेच म्हणते मी. आजची पण रजा आहे का ?' मी का चिडतो आहे हे न कळून शैला म्हणाली,

'आता मरेपर्यंत घरीच आहे.'

शैलाने एकदम मैत्रिणीकडे पाहिले. ती बिचारी गोंधळलेली दिसली. तिला वाटले असावे. आपले येणे यांना रुचले नाही की काय सगळा प्रकार माझ्याही लक्षात आला आणि मी एकदम नाटकी होत विचारले.

'अरे तुम्ही कधी आलात ? शैला, मला सांगायचंय नाही का ? काय या वेळी फार विसरलात मैत्रिणीला ? फार दिवसांनी वाकडी वाट केलीत ?'

मी हे उपरोधाने म्हणालो का मनमोकळेपणाने याचा शैला निर्णय घेऊ शकत नसावी. म्हणून तिने स्वतःच खळखळून हसून मोकळेपणा-वर शिक्कामोर्तब केले. मी तिथून सटकलो. अभ्यासिकेत येऊन सिग्रट पेटवत मनातल्या मनात शिव्यांची लाखोली वाहायला आरंभ केला.

शांती... कशी मिळणार शांती ? उभ्या आयुष्यात शांतीची अनुभूती फक्त एकदा आली. कन्याकुमारीला विवेकानंद शिला स्मार-कात गेलो असताना. माझ्याबरोबर असलेल्या पत्नीला आमच्या लहान बाळामुळे बाहेर थांबावे लागले. हे मी सांगतोय ध्यान कर-ण्याच्या खोलीबद्दल. मी एकटाच त्या शांत खोलीत जाऊन बसलो, अनेक माणसे तिथे ध्यान करीत बसली होती. समोर काळ्या चौकोनी फ्रेममध्ये पारव्या चमकदार रंगाचे ॐ फक्त दिसत होते बाकी सगळा अंधार. खरेच, अंधार इतका मृदू असू शकतो ? शांती एवढी मधूर असते ? दीर्घकाळ मीही तिथे पद्मासन घालून बसलो. अहाहा !

'खरंच मला प्रचंड शांती पाहिजे. थेट कन्याकुमारीला विवेकानंद शिलास्मारकातील ध्यान धारणेच्या खोलीत जाऊन बसल पाहिजे. आप्त मित्र कुणीच जवळ नको.'

रहिये अब ऐसी जगह चलकर जहां कोई न हो ।
हमसुखन कोई न हो और हमजबां कोई न हो ।
बे–दरो–दीवार–सा एक घर बनाया चाहिए ।
कोई हमसाया न हो और पासबां कोई न हो ।।
पटिये गर बीमार तो कोई न हो तीमारदार ।
और अगर मर जाइये तो नौहाख्वा कोई न हो ।।

एवढ्यात सोनू आणि गुंडू भांडण घेऊन आले. तोच सनातन विषय. एकच वस्तू दोघांनाही पाहिजे. कुठलीही बाजू ऐकून न घेता खाड-

खाड दोघांच्याही मुस्कटात मारली आणि ती वस्तू खसकन हिसकावून घेतली. दोघे रडत आईकडे गेले.

आता मात्र त्या मैत्रिणीने गाशा गुंडाळला. दारात चपला सरकवत ती मला म्हणाली 'बरं येते भावोजी.'

'या या' म्हणत मी तोंड फिरवले.

शैला धावत येऊन म्हणाली.

'काय झालं आज तुम्हाला ? माझ्या मैत्रिणीला काय वाटलं असेल ? लेकरांवर काय हात उचललात, कठीण आहे बाबा तुमचं.'

'शैला, कृपा करून मला दोन दिवस एकटं राहू दे. प्लीज.' असं म्हणून मी दार लावलं.

शैला बहुतेक रडतच घरात गेली.

दुपारभर पूर्ण झोपून काढली. झोपेतून उठल्यावर सुद्धा शैलाला जेवलीस की नाही हे विचारले नाही. मरू द्या. आपली कुणाला पर्वा नाही तर आपल्यालाही कुणाचीच नाही. नाहीतरी या जगाचा संबंध राहिलाच किती, आप गये, दुनिया डुबी.

मी बाहेर जायच्या तयारीत आहे हे पाहून शैलाने रडवेल्या आवाजात विचारले,

'कुठं चाललात ?'

'मसणात!' असं म्हणून मी गेटबाहेर पडलो.

कुठे, कुठे, किती रस्त्याने भटकलो याची आज गणतीच नाही. येताना रात्र झालो होती आणि अंगुर की बेटी मात्र सोबत होती. चलो अच्छा हुआ अंगुर को बेटा न हुआ।

इतका ताण आला होता की घरी येताच वातावरण बदलायचे, ठरवले. खूप गरम झाल्यावर मशीन बंद पडते ना तसेच झाले होते. नवरा गोड गोड बोलतो हे पाहून शैलाचीही लगेच कळी खुलली. अंगुरच्या बेटीसाठी तिने पापड, शेंगदाणे करायला आरंभ केला. अंडाकरीचा बेन माझ्याकडून मान्य करून घतला.

रात्री जेवण वगैरे झाल्याबरोबर मला लगेच झोप लागली असावी. मध्येच कुत्र्याच्या पिल्लाच्या कुई कुई करण्याने जाग आली. घड्याळात पाहिले तर रात्रीचे तीन वाजून गेले होते, इतका जवळ कुत्र्याचा आवाज येतो कुठून म्हणून बाहेर येऊन पाहिले तर अतिशय घाणेरडे, अंगावरचे केस ठिकठिकाणी, गळालेले, पूर्ण हाडाचा सापळा असे कुत्र्याचे पिल्लू व्हरांड्यात कुडकुडत होते.

पेकमच्या मुलाला चावले ते याचेच भावंड. मिलमधल्या चंपीचा पसारा. ते पिसाळले तसे हे पिसळणार. इतर अनेक कुत्र्यांना, माणसांना चावणार, सर्वांना रेबीज होणार. संबंध मानव जात रेबीजने नष्ट करायला बसलीय ही गलीच्छ जमात.

एक फडके शोधले आणि त्यात ते पिल्लू धरून इतक्या जोरात आणि दूर भिरकावले की ते मरावे. बाहेर थंडी फार होती म्हणून चटकन मध्ये आलो.

कुत्र्याविषयीच्या संतापाने झोप उडालीच होती. लघवी करून येईपर्यंत पुन्हा ते पिल्लू व्हरांड्यात थडकले.

आता मात्र याला मारलेच पाहिजे. गुपचूप! अर्थात रात्री तीन वाजता कोण पहाणार आहे म्हणा आणि एवढ्या थंडीत बाहेर कोण येतंय ?

त्या पिल्लाला घेऊन आणि एक दंडुका घेऊन मी थोडा दूर एका

रिकाम्या प्लॉटवर गेलो. त्याला खाली ठेवून डोक्यावर दोन तीन, दंडुके मारले. आणि थांबलो. एवढासा जीव पण जात नव्हता, शेवटी एक दगड उचलला आणि—

एवढ्या थंडीत पण मला दरदरून घाम आला. घरी येऊन हात धुतले. पाणी प्यालो.

अंथरुणावर पडल्यावर मला झोप काही येईना आयुष्यभर आपण मुंगीची पण हत्या केली नाही. आणि आज एका मुक्या जीवास नाहक मारले.

त्यानंतर किती वेळ चुळबुळ करत अंथरुणावर पडलो होतो कुणास ठाऊक !

●

## शुक्रवार १७ / जानेवारी

काल दिवसा आणि रात्री आपण फार धिंगाणा घातला. मरताना अशी वाईट प्रतिमा करून मरणे बरे नव्हे. लेकरांना मारणारा बायकोच्या मैत्रिणीला हाकलून लावणारा, कुत्र्याचे पिल्लू ठार मारणारा छे छे ! मरायचंच आहे तर तमाशा कशाला करायचा ? शांत रहावे. शक्य झाल्यास ' गाईड 'मधल्या राजूसारखे हिरो होऊन मरावे. फुकटचं हौतात्म्य मिळाले तर वाईट का आहे ?

मृत्युपत्र करण्याइतकी इस्टेट तर काही नाही. पंडीत नेहरूंसारखे काहीतरी लिहून ठेवले पाहिजे. आपल्या अस्थि विमानातून हिमालय, गंगा यात कुणी टाकणार नाही तेवढे भाग्य काही नको. पण मोकाट कुत्र्यांचा प्रश्न आपल्या देशाला भेडसावणाऱ्या प्रश्नापैकी एक आहे. परांजपेने हा प्रश्न पुण्यात हाताशी घेतला होता. सर्वत्र प्रयत्न हवेत. कुत्रा पाळणे कटकटीचे कायदेशीररीत्या कठीणतम झाले पाहिजे. ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका सोडून जगात सर्वत्र असणारा रेबीज नष्ट होण्याकरिता युनेस्कोपासून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. सायप्रस न्यूझीलंड, हवाई व युनायटेड किंगडम या चार देशांनी हा रोग आपल्या देशात येऊच दिला नाही. त्यांनी काय केले याचा अभ्यास व्हावा. रेबीज नष्ट व्हावा या दृष्टीने भरीव प्रयत्न करणे हीच मला खरी श्रद्धांजली ठरेल.

रेबीज झाला की नंतर कदाचित काही सुचायचे नाही. मित्रांना

बोलवून घ्यावे काय? पत्र टाकावे की फोन लावावेत. आई–वडिलांना बोलवावे काय? या सर्वांना बोलवले आणि लगेच काही झाले नाही तर उगीच हसे. लांडगा आला नसताना बोलवायचे आणि लांडग्याचा पत्ता नाही. असे करून करून खरेच लांडगा तोडेल तेव्हा जवळपास कुत्रादेखील नसेल.

शिवाय आपण बोलवा आणि कुणी नाही आले तर? गेल्या आठ नऊ दिवसात जीवनाचा, हसण्याचा लिप्ताळा किती कमी झालाय. कशाचेच काही वाटेना. माणसे शेवटपर्यंत आपल्या कसोटीला उतर-तील असे सोने नाहीयेत. बेगडाची आहेत, पितळाची आहेत. त्यांच्या अंतापर्यंत कशाला जायचे? त्यापेक्षा झाकलेली मूठ बरी. बोलावणे नको. तेवढीच मनाला फुंकर!

जगण्यातली इच्छा आणि ग्लॅमर खलास होत चाललंय. पुनर्जन्मा-वर विश्वास नाही. करायचा काय पुनर्जन्म? तो जातक कथेतला गुरू मृत्यूनंतर डुक्कर होतो आणि त्याला डुकराचा जन्म माणसाच्या तुलनेने आवडतो. आपण तर माणसाच्या जन्मातच डुकराच्या स्थितीला आज गेलो आहोत.

इतर प्राण्यांचे काय हाल असतील. माणसांची बुद्धी, प्रयत्न लाभूनही आपण हायड्रोफोबिया रोकू शकलो नाहीत. बाकीच्या प्राण्यांना निमूटपणे भोगण्याखेरीज काहीच स्वाधीन नाही. तेव्हा असला तरी आता पुनर्जन्म नकोच. हवी आहे शांती. चिरशांती. अशा मुक्कामावर जाणे, जिथून आणखी कुठे परत जावे लागत नाही. यद्गत्वा न निवंर्न्ते तद् धाम परमं मम। अशा शांतिप्रत मला आता जायचे आहे.

शेजारच्या घरातून मधूने आवाज दिला–

'सर, आहे का फुरसत?'

'हो, हो. ये नं.'

याच्या आधी मधू येऊन गेला त्यापेक्षा आता माझी मानसिक स्थिती खूपच खालावली होती. शैलानेही तक्रार केली असावी. मधू

फो...५

आल्या आल्या म्हणाला–

'सर, तुम्हाला हायड्रोफोबियाचाच फोबिया झाला आहे. बाकी काही नाही. तुम्ही डोक्यातून काढून टाका तो विषय'

'डोक्यात नाहीच रे माझ्या!' मी बळेच हसत म्हटले, 'आपल्याला ती कादंबरी लिहायची आहेत ना!'

'हं, मी पुस्तक आणलंय.'

'थांब हं, मी जरा लिहून घेतो.'

मधूने इंग्रजी पुस्तकातून वाचून मराठीत स्पष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला. मी त्याच्या समाधानासाठी मधून मधून लिहून घेत होतो. स्वत:शी तो तपशील पडताळून पहात होतो.

'रेबीज हा शरीराच्या बाहेरून होणारा रोग आहे, तीव्र आणि वेगाने कातडीवर होणारे प्राणघातक असे ते इन्फेक्शन आहे. माणसाच्या बाबतीत तो बरा न होणारा रोग आहे. रेबीज झालेला प्राणी चावल्यामुळे तो होतो.'

'रेबीज जेव्हा माणसाला होतो तेव्हा त्याला हायड्रोफोबिया म्हणतात. पाण्याची भीती हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. गिळणारे स्नायू आकुंचन पावण्यामुळे पाणी पिताना आत्यंतिक वेदना व दाह होतो. एका डॉक्टरने त्याची तुलना प्रसूतिवेदनेशी केली आहे.'

'हा एकच रोग असा आहे ज्यात मृत्यूचे प्रमाण शंभर टक्के आहे. भारतात दरवर्षी २५ ते ३० हजार लोक याने मरतात.'

मधु सांगत असताना माझा चेहरा काळानिळा होत असावा. तो म्हणाला, मेडिकल सायन्सची माहिती सांगण्याऐवजी महत्त्वाची, सामाजिक तेवढी माहिती सांगतो.

घोगऱ्या आवाजात मी म्हणालो, 'हो.'

'रेबीजचे दोन प्रकार. अर्बन रेबीज, वाईल्ड लाईफ रेबीज. म्हणजे जंगली प्राण्यामुळे होणारा रेबीज. अर्बन रेबीज मोकाट कुत्र्यामुळे होतो.

रेबीज प्राण्यांची लाळ हे या रोगाचे मूळ आहे. कुत्रा पिसाळलेला दिसण्याच्या सहा दिवस अगोदर त्याच्या लाळेत रेबीजचे जंतू

असतात. आणि ही लाळ कुत्रा मरेपर्यंत जंतुवर्धक असते.

इन्फेक्शन पिरीयड म्हणजे जंतू शरीरात गेल्यापासून ते लक्षणे दिसेपर्यंतचा काळ कुत्रा चावल्यापासून सामान्यपणे तीन महिन्यापर्यंत ही लक्षणे दिसण्याचा काळ असतो. हा काळ पुढील गोष्टीमुळे कमी जास्त होऊ शकतो. चावल्याची जागा, तीव्रता, जंतू किती प्रमाणात गेले, कपड्यावरून चावला का उघड्या अंगाला, ट्रीटमेंट किती घेतली यावर हा काळ कमी जास्त होणे अवलंबून आहे.

आपल्याला पायाला चावला, थोडा चावला, कपड्यावरून चावला हे सगळे अनुकूल आहे. पण ट्रीटमेंट अर्ध्यापेक्षा कमी घेतली. चौदापैकी तीन इंजेक्शन फक्त.

'सर, तुमचं लक्ष आहे न ?'

'अं ऽऽ–हो.'

'पहिल्या तीन महिन्यात जास्तीत जास्त शक्यता असते. एक वर्षात एक टक्का शक्यता आणि दोन वर्षानंतर जवळपास नसते.'

म्हणजे वाचलो तरी दोन वर्षे टांगती तलवार आहेच.

लक्षणे–शारीरिक–ताप येणे १०० किंवा १०१, थकवा, डोके दुखणे ही लक्षणे २ ते ४ दिवस. जखमेच्या ठिकाणी दुखणे व खाज सुटणे. संपूर्ण मज्जासंस्थेवर याचा परिणाम होत असल्याने–

१) आवाज सहन न होणे २) प्रकाश सहन न होणे ३) थंड वाऱ्याची झुळुक सहन न होणे ४) स्नायूंचे आकुंचन ५) डोळ्यातील बुबुळांचे प्रसरण ६) घाम जास्त येणे ७) अश्रू येणे ही लक्षणे दिसतात.

आपल्यात ही सर्वच्या सर्व लक्षणे कमी अधिक आहेत.

'मानसिक बदल–मरणाची भीती, राग, चिडचिड, डिप्रेशन'

हे सगळं मला होतंय–

'ही शारीरिक व मानसिक लक्षणे क्रमाने वाढत जातात व त्या सर्वांचे एकत्रीकरण द्रव पदार्थ गिळता न येण्यात होते. रेबीज वाढल्यानंतर सहज जरी पाण्याचे दर्शन किंवा आवाज झाला तरी त्याचे गिळण्याचे स्नायु आकुंचन पावण्यात परिणाम होतो, रेबीज झाल्या-

नंतर २–३ दिवस ही लक्षणे दिसतात. जास्तीत जास्त सहा दिवसात रोग्याला पॅरालिसिस किंवा स्नायूंच्या झटक्याने मरण येते.'

'रेबीजची ट्रीटमेंट सांगू का ? अर्थात ही ट्रीटमेंट म्हणजे त्याला शांतपणे मरण यावे म्हणून असते.'

'नको. नको.' मी म्हणालो.

'आता रोगप्रतिबंधक उपाय–एक जखमेवर करावयाचे उपचार– जखम भरपूर पाण्याने व साबणाने लवकरात लवकर धुवावी.'

'आपण मुळीच आपली जखम दोन–तीन दिवस धुतली नाही.'

'दोन–दहा दिवस प्राण्याचे निरीक्षण करावे. कुत्रा जर दहा दिवसांनी जिवंत राहिला तर रेबीजची रिस्क जवळपास नसते. दहाव्या दिवशी जरी रेबीजची लक्षणे दिसली तर रेबीज आहे.'

'तीन–ॲण्टी रेबीज ट्रीटमेंट घेण्याजोगी परिस्थिती–कुत्रा रेबीज लक्षणयुक्त असेल तर, कुत्रा मेला तर, टेस्ट न करता येणारा कुत्रा असल्यास, कोणताही जंगली प्राणी चावल्यास.'

आज किंवा उद्या एकदा कुत्रा पाहिला पाहिजे. त्याच्यावरच आता सगळे अवलंबून आहे.

'व्हॅक्सीनेशन प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ते दिले जाते. ॲण्टीरेबीज हे एकमेव व्हॅक्सीन असे आहे की ते चावल्यानंतरच घ्यावे लागते. आधी घेऊन (पोलिओसारखे) उपयोग नाही.'

'उपचाराच्या काळात घ्यावयाची खबरदारी–इंजक्शन घेतल्या-नंतर एक महिना अल्कोहोल घेऊ नये.

आपले तर दोन्ही बाबतीत कुपथ्य झाले.

'कॉम्प्लीकेशन ट्रीटमेंटचा कोर्स पूर्ण घेतला नाही तर रेबीज होऊ शकतो.'

आपण कोर्स पूर्ण घेतला नाही.

'नियंत्रण–मोकाट व बेवारशी कुत्र्यांना मारावे. पाळीव कुत्र्यांचे रजिस्ट्रेशन, लायसन्स पद्धती ठेवावी सार्वजनिक ठिकाणी कुत्री नसावीत. कुत्र्यांना इंजेक्शन द्यावीत. कुत्र्यांना किंवा मांजराला इतर प्राणी चावला तर त्यांना नष्ट करावे. लोकांना या रोगाची माहिती

द्यावी.'

'कोणत्या देशाविषयी बोलता तुम्ही मि. मधु? यह भारत देश है मेरा-'

मधु थांबला आणि मी अधिक प्रश्न विचारले नाहीत.

दोन बैठकीत मिळून मधुशी चर्चा करण्यात आजचा सगळा दिवस गेला. उद्या दहावा दिवस...

## शनिवार / १८ जानेवारी

मधूशी चर्चेपासून कुत्रोबांना पाहुयची प्रचंड ओढ लागली. कधी एकदा सकाळ होते या विचारात कालची रात्र काढली. सगळे लक्ष आता त्या कुत्र्याकडे लागून राहिले आहे. जीने की वजह आणि मौत का सामना आता तोच आहे.

सकाळी उठल्याबरोबर गडबडीने प्रातर्विधी आटोपून घराबाहेर पडलो आणि कुत्रा पाहुयला मोंढयाकडे निघालो.

अर्ध्या वाटेतच गुलाब रिक्षावाला भेटला. त्याला पाहाताच म्हणालो ' गुलाब, मोंढयात जायचंय. '

गुलाबचा चेहरा विलक्षण पडलेला. कसाबसा तो म्हणाला, ' सर तिकडूनच आलोय मी आत्ता. सगळीकडे पाहुयलं, सगळयांना विचारलं. पण .. पण...आपल्यावालं कुत्रं गायब आहे–

●

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७ | २४ | इन्वेक्शन | इन्स्पेक्शन |
| १४ | ५ | चाव्याच्या | वाद्याच्या |
| १४ | ५ | घडते | उघडते |
| १४ | १८ | चावलान | चावलाय |
| १६ | १४ | अर्क्षा | आधी |
| १९ | २० | हा | पहा |
| २४ | २७ | झोपायला | झापायला |
| ३८ | १३ | खावणारी | खाववणारी |
| ४९ | १० | योगच | रोगच |
| ५० | १२ | स्वाभाविक | अस्वाभाविक |
| ५० | २५ | हळदी कुंकवासाठी | शैला हळदीकुंकवासाठी |
| ५१ | १ | मला | आवा |
| ५३ | ९ | जाणीव | गाणी |
| ५३ | ९ | हाव | ठाव |
| ६१ | ५ | हमजबां | हमजुबां |
| ६१ | ८ | पटिये | पडिये |

ग्रा. क्र. २६०७
विभाग ७/५१

# आभार

ही कादंबरी प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रा. श्रीकांत देशपांडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. सौ. सुशील आणि रवीन्द्र सुर्वे, रा. दा. अंबेकर, सौ. विजया आणि अरुणा जोशी, सौ. वसुंधरा आणि विलास जोशी, डॉ. मधुकर पाठक यांनी वाचून महत्त्वाच्या सूचना केल्या. तिचे ' फोबिया, दाय नेम इज फोबिया ' असे नामकरण सौ. सुशील सुर्व्यांनी केले.

' बुवा ' च्या दिवाळी अंकात ती निरंजन घाटे आणि रवि बेहेरेनी प्रसिद्ध केली. रवीने अत्यल्प दरात ती छापून दिली. हे दोघेही जिवा-भावाचे मित्र आहेत. त्यांचे आभार कसे मानायचे ?

सेलूच्या ' स्टेट बँक ऑफ हैदराबाद'चे सर्वश्री बी. आर. मेवलेकर, एस. जी. पाटील आणि रवि कुलकर्णी यांनी प्रकाशनासाठी अर्थ-सहाय्य दिले.

या कादंबरीत एकही काल्पनिक प्रसंग नाही. निर्मिती प्रक्रियेत किती एक कवींच्या कविता, गाण्याच्या ओळी संज्ञा प्रवाहावर तरंगत आल्या, त्या तशाच नमूद झाल्या. जाणिवांच्या या सहोदरांबद्दल काय लिहावे ?

या सगळ्या कारव्यासह माझी ही पहिलीच कादंबरी रसिकांपुढे ठेवत आहे.

विश्वास वसेकर

BVBK-0402641